गुरुवार, ४ जुलै २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २९९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 4 JULY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-299 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# ज्यांना सख्खे भाऊ नाही समजले, त्यांना 'लाडकी बहीण' काय कळणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : उद्धव ठाकरेंना लगावला टोला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : काही लोके म्हणाले लाडक्या बहिणीचे झाले, लाडक्या भावांचे काय?, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी नाव न घेता उद्धव ठाकरेंना टोला लगावला. ज्यांना सख्खे भाऊ नाही समजले, त्यांना लाडकी बहिण योजना काय कळणार, असा जोरदार पलटवार एकनाथ शिंदेंनी ठाकरेंवर केला. तसेच, आम्ही तेही केले. लाडक्या भावांचा देखील आम्ही निर्णय घेतला आहे. राज्यातील 10 लाख मुलांना अप्रेंटीशीप आम्ही देतोय, 10 हजार ते 8 हजार रुपये दरमहा या तरुणांना मिळणार आहेत. त्याची अंमलबजावणी तत्काळ होण्यासाठीची व्यवस्था देखील आम्ही करत आहोत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.**

महायुती सरकारच्या माझी लाडकी बहीण योजनेच्या निर्णयाचे सर्वच स्तरातून स्वागत होत असून महिलांनी सेतू कार्यालयाबाहेर आणि संबंधित कार्यालयाबाहेर योजनेचा अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी केली आहे. राज्य सरकारकडून अधिक चांगल्या, सहज व सुलभपणे ही योजना राबविण्यासाठी नियमांत काही अनुकूल बदलही करण्यात आले आहेत. दुसरीकडे या योजनेचे स्वागत करताना विरोधकांनी राज्य सरकारला टोलाही लगावला. त्यावरुन, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सभागृहातूनच पलटवार केला आहे.राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर, त्यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेची माहिती दिली. सरकारच्या या निर्णयाची चांगलीच चर्चा राज्यभरात होत आहे. मात्र, शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या योजनेचे स्वागत करताना सत्ताधाऱ्यांना टोमणाही मारला होता. लाडक्या



बहिणींसाठी योजना आली, त्याचं स्वागत पण लाडक्या भावांसाठीही योजना आणावी, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. त्यावरुन, आता मुख्यमंत्री शिंदेंनी टोला लगावला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, योजना मिळवण्यासाठी महिलांची गर्दी होत आहे. या गर्दीचे फोटो काढले पाहिजेत, खरंतर या सभागृहात काही चांगले फोटोग्राफर्सही आहेत. त्यांनी रियल फोटोग्राफी सोडून जमिनीवरचेही फोटो काढले पाहिजेत, ही गर्दी पाहून त्यांचे चेहरेही फोटो काढावेत असेच होतील, असे म्हणत मुख्यमंत्री शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, अर्ज भरुन घेणे यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास, प्रक्रियेत दिरंगाई केल्यास किंवा योजनेच्या लाभासाठी महिलांकडून पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे, जलदगतीने होईल यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे, या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

# लोणावळा भुशी डॅम दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मदत

## अजित पवारांची विधानसभेत घोषणा

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** लोणावळा भुशी डॅम परिसरात 30 जून रोजी रविवारी एक मोठी दुर्घटना घडली. भुशी डॅमच्या बॅकवॉटरमधील धबधब्यावर एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेले. या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्र्यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. तर भुशी धरण दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या पीडितांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवारांनी विधानसभेत केली. पावसाळी सहलीसाठी लोणावळ्यातील भुशी धरण परिसरात गेलेल्या कुटुंबासोबत मोठी दुर्घटना घडली आहे. भुशी डॅम परिसरातील धबधब्यामध्ये पुण्याच्या हडपसरमधील अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली. भुशी धरणाच्या मागील धबधब्यात पाच जणांचे अख्खे कुटुंब वाहून गेले असून यामध्ये लहान मुले आणि महिलेचा समावेश आहे. या दुर्घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. भुशी धरण दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या पीडितांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. पॉईंट ऑफ ऑर्डरच्या माध्यमातून भुशी धरण दुर्घटनेतील पीडितांच्या कुटुंबियांना मदत देणे आणि धोकादायक स्थळांवर सुरक्षाव्यवस्था करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत उत्तर देतांना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, भुशी धरण परिसरातील दुर्घटना दुर्दैवी असून अशा दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्यात येईल. या निधीतून संभाव्य धोकायदायक ठिकाणी प्रतिबंधात्मक माहिती फलक लावणे, कुंपण घालणे, सुरक्षीततेसाठी जाळ्या लावणे आदी कामे करण्यात येतील. पर्यटकांची वर्दळ असलेल्या ठिकाणी माहितीफलक लावणे, सुरक्षिततेच्या उपाययोजना करणे आदी कार्यवाही आधीपासूनच करण्यात येत आहे. त्याच धर्तीवर दुर्गम धोकादायक स्थळीही सुरक्षिततेबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आणि जिल्हा नियोजन अधिकारी यांना देण्यात येईल.

# अरविंद केजरीवाल यांचे सीबीआयवर आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मद्यधोरण घोटाळ्यात त्यांना केलेल्या अटकेचा निषेध नोंदवत जामीन मिळावा म्हणून न्यायालयात अर्ज केला आहे. आम आदमी पार्टीचे संस्थापक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आपल्या याचिकेत सीबीआयवर गंभीर आरोप केले आहेत. अरविंद केजरीवाल हे सध्या मद्य घोटाळा प्रकरणात आणि आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अडकले आहेत. त्यांच्यावर ईडी आणि सीबीआयने कारवाई केली आहे. मात्र आपल्या अटकेच्या निर्णयाला त्यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. अरविंद केजरीवाल यांनी सीबीआयवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी याचिकेत म्हटले आहे की, एप्रिल २०२३ मध्ये जेव्हा मला चौकशीसाठी बोलवण्यात आले तेव्हा मी त्यांना सहकार्य करण्याची तयारी दर्शवली होती. मात्र मला वारंवार त्रास देण्यात आला. सीबीआय चौकशीच्या नावाखाली मला किती मानसिक त्रास देता येईल हेच सीबीआयने पाहिलं. सीबीआयची वागणूक हा माझा मानसिक छळ आहे याला दुसरं काहीही म्हणता येणार नाही. तसेच माझी चौकशी पूर्ण झाली आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. सीबीआयच्या विरोधात केलेल्या या याचिकेत केजरीवाल म्हणतात, मला अटक करण्यासंबंधीचे पुरावे आधीच रेकॉर्डवर आहेत. सीबीआयसारखी संस्था कायदेशीर प्रकियेशी खेळ करते आहे. सीबीआयचा दृष्टीकोन पक्षपाती आणि एकतर्फी आहे. त्यांनी निःपक्षपातीपणे काम करणे अपेक्षित आहे. मात्र ते तसं वागताना दिसत नाहीत उलट ते माझा छळ करत आहेत. सीबीआयचे अधिकारी देत असलेली वागणूक ही निष्काळजीपणाची आहे तसंच अधिकाराचं हनन करणारी आहे. माझ्या स्वातंत्र्यावर घाला घालण्याचं काम सीबीआयने केलं आहे. तसंच मला जामीन मिळू नयेत यासाठीही सोयीस्कर प्रयत्न करण्यात आले असाही आरोप अरविंद केजरीवाल यांनी केला आहे. आज तकने हे वृत्त दिलं आहे. केजरीवाल यांनी म्हटलं आहे की माझा छळ केला जातो आहे. ज्या पुराव्यांच्या आधारे मला अटक करण्यात आली ते पुरावे आधीच रेकॉर्डवर आहेत. १ वर्षे १० महिन्यांनी मला अटक केली गेली याबाबतही प्रश्न उपस्थित होतो. कारण जर पुरावे होते तर इतके महिने मला अटक करण्यासाठी वाट का पाहिली गेली? माझी सुटका व्हावी, जामीन मिळावा यासाठी मी जे प्रयत्न करत होतो त्यापासूनही मला रोखण्यात आले असेही केजरीवाल यांनी म्हटले आहे. कलम ४१ (१) (ब) चे उल्लंघन करण्यात आलं. मला कैद करतानाही मनमानी पद्धतीने नियम धाब्यावर बसवण्यात आले.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


प्रदूषण, चुकीचा आहार-विहार इ मुळे कितीतरी आजारांची निर्मिती होते. त्यात सुधारणा केली तर अनेक आजार आपण टाळू शकतो. आपल्या आहारविहार, विचारात बदल केल्याने या सगळ्यात सुधारणा होऊ शकते. शारदा बापट या नावापासून सुरु झालेला आणि डॉ शारदा बापट यांच्यापर्यंत झालेला हा प्रवास अतिशय रंजक आणि रोमांचक आहे. अर्थात त्यांचा प्रवास अविरत सुरूच असतो. तो संपलेला नाही. हा प्रवास त्यांच्या जिद्दीची ,आणि सतत नवनवीन शिकण्याची साक्ष पटवणारा आहे. बी ए ला इंग्रजी विषय घेऊन पदवीधर झालेल्या शारदाताईंनी सिम्बॉयसिस कॉलेजमध्ये डिप्लोमा इन कंप्युटर अप्लिकेशन केला. नंतर त्यांनी इलेक्ट्रॉनिक सेफ्टी डिव्हाइसेसशी संबंधित व्यवसायात भागीदार म्हणून पदार्पण केले. हे काम करीत असताना त्यांनी डबल एंट्री अकौंटिंगचे ज्ञान पण प्राप्त केले. या दरम्यान त्यांचे नरेंद्र बापट यांच्याशी लग्न झाले आणि लवकरच त्या आईसुद्धा झाल्या. याच दरम्यान त्यांनी एल एल बी चे शिक्षण घेऊन कायद्याची पदवी देखील प्राप्त केली. डॉ शारदा यांची आई त्या आठवीत असल्यापासून सतत आजारी असायची. तिच्या खूप तक्रारी असायच्या.




## हितगुज



पुष्प
१०६वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## झाडाच्या मुळालाच पाणी घाला!

श्री स्वामी महाराजांचे स्मरण प्रपंचाची आसक्ती कमी करण्यासाठी आहे. मनाला स्वामींच्या स्मरणात गुंतवून ठेवले की, समाधान मिळते. आपल्या सध्याच्या अवस्थेमध्ये 'महाराजांच्या इच्छेने घडायचे ते घडते' असे मानणे किंवा 'स्वामी महाराज चांगलेच करतील' असा विश्वास ठेवून वागणे हे दिसायला साधे दिसले तरी यात फार मोठे मर्म साठविलेले आहे. 'श्री स्वामी महाराजांच्या इच्छेने घडणार ते घडू द्यावे.' अशी निष्ठा उत्पन्न व्हायला त्यांचे अनुसंधान सतत ठेवले पाहिजे, इतरांनी आपल्याला दुःख दिले असता आपले अनुसंधान चुकणे ही आपली चूक आहे. विषय, वासना कशा सुटतील? मन एकाग्र कसे होईल? हे न कळले तरी चालेल. सोडण्याच्या गोष्टींचा अभ्यास करण्यापेक्षा धरण्याच्या गोष्टींचा म्हणजे अनुसंधानाचा, सतत नामस्मरणाचा अभ्यास करावा हे झाडाच्या मुळाला पाणी घालण्यासारखेच आहे. 'अज्ञानाच्या अंधकाराने दुःख भोगत असतांना तू माझे स्मरण ठेव म्हणजे तुला पुढे उजेड दिसेल.' असे गीतेमध्ये प्रत्यक्ष श्रीकृष्णच अर्जुनाला सुचवीत आहेत. दिवा जळायला हवा असेल तर त्यामध्ये सतत तेल घातले पाहिजे, तसे श्री स्वामी महाराजांचे अनुसंधान सतत राहण्यासाठी आपण त्यांचे सदैव नामस्मरण करीत रहावे.

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

पाण्यात टाकलेले मीठ ज्याप्रमाणे विरघळून जाते त्याचप्रमाणे या लययोगाने मन ब्रह्मतत्त्वामध्ये लीन होते व योग्याला अनेक सिद्धी प्राप्त होतात. परंतु योगाने या सिद्धींच्या लोभात न अडकता आपली पुढची प्रगती साधायला हवी. हा अमनस्क योग केवळ 'गुरुमुखैकगम्य' म्हणजे केवळ गुरुच्या मुखातूनच प्राप्त होणारा आहे.



नाथांचा 'अवधूतगीता' हा ग्रंथ नाथपंथीयांमध्ये प्रमाणग्रंथ मानला जातो इतकी त्याची योग्यता मोठी आहे. ह्या गीतेत श्रोता आहे कार्तिकेय आणि उपदेशक आहे भगवान् श्रीदत्तात्रेय. या ग्रंथात सर्वव्यापक असा केवळ आत्माच असून तेथे कसल्याही प्रकारचा भेदाभेद असू शकत नाही हे वेदान्ताचे सार सांगितले आहे. ('आत्मैव केवलं सर्वं भेदाभेदो न विते।') आत्मा हा शुद्ध, निर्मळ, अव्यय, अनंत, शुद्ध ज्ञानस्वरूप आणि सुखदुःखातीत असा आहे. तो आतून व बाहेरून चैतन्यरूपाने नटलेला आहे. साकार व सगुण हे सर्व खोटे असून निराकार, शुद्ध, नाशरहित व जन्मरहित असा एक आत्माच सत्य आहे. त्याला आदि, मध्य व अंत अशा अवस्था नाहीत. तो पुरूष नाही की स्त्री वा नपुंसकही नाही. तो षडंगयोगाने वा मनोनाशाने शुद्ध होत नाही. कारण तो स्वभावतःच शुद्ध आणि निर्मळ आहे. अशाप्रकारे या 'अवधूतगीते'त आत्मतत्त्वाचा ऊहापोह असून सर्व नाथसिद्धांना गुरुस्थानी असलेल्या भगवान् दत्तात्रेयांच्या मुखातूनच या गीतेचा उदय झालेला असल्यामुळे समस्त नाथपंथात या 'अवधूतगीते'ला फार महत्वाचे व मानाचे स्थान प्राप्त झाले असल्यास नवल नाही. गोरक्षनाथांच्या ६८ उपलब्ध ग्रंथांपैकी सर्वच ग्रंथांचा असा परिचय स्थलाभावी करून देणे केवळ अशक्यच आहे. मात्र या सर्वच ग्रंथात गोरक्षनाथांनी योग, आत्मा, पिण्डब्रह्माण्ड, अजपा जप, जीव आणि परमात्मा यासारख्या महत्वाच्या विषयांची मौलिक चर्चा केलेली दिसून येते.

गोरक्षनाथांचा उपदेश व तत्त्वज्ञान गोरक्षनाथांनी हिंदी, संस्कृत भाषेत अनेक ग्रंथ लिहिले. या ग्रंथांतून त्यांनी साधकांना जो मौलिक उपदेश केला आहे त्या उपदेशाचे सार किंवा तत्त्वज्ञान साधारणतः पुढीलप्रमाणे सांगता येईल, ते म्हणतात, 'ज्याने जिभेवर नियंत्रण मिळविले त्याने सर्व काही जिंकले. फाजील आहार घेतल्याने इंद्रिये प्रबल होऊन ज्ञान नष्ट होते. जो मनुष्य आसन, आहार व निद्रा यांच्या संबंधीच्या नियमांचे काटेकोर पालन करतो तो वृद्धावस्थेवरच नव्हे, तर मृत्यूवरही मात करतो. मांस, मदिरा भक्षण करण्यापासून जोआनंद मिळतो त्यापेक्षा कितीतरी पट अधिक आनंद योगसाधना करून मिळतो. जीवाची हत्या कधीच करू नका. त्यांच्यावर दया करा. कारण सर्व योगसाधनेचे व अध्यात्माचे मूळ दया हेच आहे. आपले आचार-विचार शुद्ध राखण्यासाठी साधकाने काम, क्रोध, अहंकार, विषयविकार, तृष्णा आणि लोभ यांचा त्याग करायला हवा. हसा, खेळा परंतु ब्रह्माला विसरू नका. रात्रंदिवसस ब्रह्मज्ञानाचीच चर्चा चालू असायला हवी. अल्प-स्वल्प आहार हाच शरीररक्षणाचा उत्तम उपाय आहे.



आधुनिक केसरी

## दिसे विटेवर माता


सुख घ्यावे सुख द्यावे | चराचर आनंदावे ||१||
दुःख भोगावे भोगावे | दुःख विठ्ठला सांगावे ||२||
मना आवर आवर | सुखा, दुःखाला सावर ||३||
सुख दुःख दोन्ही चाक | जीवनाचे सार एक ||४||
देह भोगाचे भांडार | पाप-पुण्याचे आगर ||५||
पुण्यवंत भाग्यवंत | कर्म ज्ञान भक्ती पंथ ||६||
मौन साधना साधक | नरजन्माचे सार्थक ||७||
मन आनंदाचे घर | मन मोक्षाचे रे द्वार ||८||
दिंडी आनंदली आता | दिसे विटेवर माता ||९||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सिद्ध होय जब धारणा,
वृत्ति प्राण मन लीन ।
ज्ञान आय निज रुप में, आपहिं आप
अधीन ।।१७।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
दशम अध्याय) ०२/१०/१७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जेव्हा विहंगम योगाची धारणा सिद्ध
होते, तेव्हा सगळ्या वृत्ती, प्राण आणि
मन आपल्या मुळ कारणात लीन होऊन
जातात. त्यानंतर आत्मा आपल्या
स्व-स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून निज
शक्तींना आपल्या आधीन करून
आपल्या स्व-स्वरूपात स्थित होतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

अंगावरून वारे गेले की हातपाय सुकतात, भरात आलेली पिके भुईसपाट होतात.अनेक प्रकारच्या रोगांनी वायूमुळे मानव जातीला धोका उत्पन्न झाला आहे. हे करोना सारख्या महामारी मूळे आपण शिकलो आहोत.संपूर्ण मानवजातीला धोका निर्माण झाला होता. वायूमुळेचं आकाशात वीज निर्माण होते. वायूमुळे गायकांना व्यवहारातील राग निश्चितच कळतो दिप रागाने दिवे लागतात. मेघ मल्हारच्या रागाने दिवे लागतात.वायू फुंकल्यामुळे माणसांना भूरळ पडते. अंगावरील गळवे गळून पडतात. मंत्राने देवता प्रगट होतात. जादूगार जादूच्या गोष्टीकरून दाखवतो, हातचलाखी करतो.मंत्राने देवता प्रगट होतात. तर देवादिकांना देखील न कळणारी राक्षसाची मायामय रचना हे राक्षस योनीतील अघोरी लोक मंत्राच्या सहाय्याने करतात. एखाद्याला एकदाचं जागी खिळवून ठेवणे भुरळ पाडते,माणसाला पूर्ण पणे वंश करणे असे विचित्र व अघोरी विद्या हे लोक करतात. चांगल्या धडधाकट माणसाला वेडं करणे व वेड्याला शहाणं करणे हे वायु चे विकार आहेत. देवांच्या लढाया मंत्राच्या सहाय्याने होतात. तर ऋषींचा दरारा मंत्र सामर्थ्यावर अवलंबून असतो.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## सद्गुरूची कामगिरी

आधुनिक केसरी

सद्गुरूची कामगिरी कोणती ? आरशावर धूळ पडलेली असते, ती बाजूला सारायला सद्गुरू सांगतात; आपले चुकते कुठे ते सद्गुरू सांगतात. सद्गुरू आपल्याला मार्गाला लावतात. स्वप्नामध्ये तलावात पडला म्हणून ओरडू लागला, तोच जागा झाल्यावर ओरडायचा थांबला ! सद्गुरू जागे करण्याचे काम करतात. मला करायचेच काही उरले नाही असे ज्याने म्हटले, त्याने सद्गुरू खरोखर केला असे म्हणावे. एखादा सुखवस्तू गृहस्थ 'मी स्वस्थ आहे' असे म्हणतो, पण ते काही खरे नाही. मन जोवर गिरक्या मारते तोपर्यंत तो स्वस्थ आहे असे नाही म्हणता येणार. शिष्याच्या भावनाच गुरूला गुरुपद देतात. जो शरण जातो त्याचा कार्यभार सद्गुरू उचलतो. ज्याची दृष्टी रामरूप झाली तो खरा गुरू. जे चिरकाल टिकते ते गुरुपद समजावे. खरोखर, सद्गुरू म्हणजे मूर्तिमंत नामच होय. गुरूने सांगितलेले अक्षरशः पाळणे हेच खरे साधन. संत कुणालाही देहाने कायमचे लाभले नाहीत. संतांना भगवंताचा जो ध्यास असतो तो महत्त्वाचा आहे. पुष्कळांना



संतांची गाठ पडते, परंतु सत्संगतीचे महत्त्व न कळल्यामुळे बहुतेकांना त्यापासून जो व्हायला पाहिजे तो फायदा होत नाही. आपली जी कर्तव्ये ठरली आहेत ती आपण बरोबर करावीत.

व्यापार थोडक्या प्रमाणात केला तर पुढे वाढतो, त्याप्रमाणे कर्तव्य करीत गेल्याने फलाची आशा आपोआप सुटेल. आपले कर्तव्य कोणते ते सद्गुरू आपल्याला दाखवून देतात. रथ आहे खरा, पण जर त्याला सारथी म्हणजे चालवणारा नसेल, तर रथ कुठेतरीच जाईल. केवळ ' गाडी माझी आहे ' म्हणून ती मालकाला चालविता येणार नाही; साधी बैलगाडी सुद्धा चालविता येणार नाही. आपला देह मनुष्य आपल्या मनाने चालवितो, आणि खड्ड्यामध्ये पडतो. सद्गुरू हे गाडीवानाचे काम करतात आणि आपल्या देहरूपी गाडीला योग्य रस्त्यावरून नेतात. आपण नेहमी भगवंताच्या अनुसंधानात मग्न असावे आणि गाडीवानावर विश्वास ठेवून निर्धास्त असावे, मग कसलाच धोका उरणार नाही; आपल्या नशिबात जेवढे मिळायचे असेल तेवढेच आपल्याला मिळणार, अशी वृत्ती बनून आपले हवेपण कमी होईल. मनाची ही वृत्ती झाली की, जे घडेल ते भगवंताच्या इच्छेनेच घडेल असे आपल्याला वाटू लागेल. असे वाटू लागले की समाधान चालत घरी येईल. पण हे सगळे होण्यासाठी आपल्या अंतःकरणाची शुद्धता हा पाया आहे.

## निरूपण

आधुनिक केसरी

विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ॥ ६१ ॥
सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन ।
त्यासी कैंचें समाधान । लोलंगतासी ॥ ६२ ॥
जयास वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें ।
स्वजन सकळही त्यागावे । दुःखमूळ जे ॥ ६३ ॥
जेथें वासना झोंबोन पडे । तेणेंचि अपायें दुःख जडे ।
म्हणौनि विषयवासना मोडे । तो येक सुखी ॥ ६४ ॥
विषयजनित जें जें सुख । तेथेंचि होतें परम दुःख ।

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, ४ जुलै २०२४
adhunikkesari.com

# वन विभागाची अवैध झोपड्यांवर कारवाई

## नागरिकांच्या संमतीने 70 झोपड्यांवर फिरवले बुलडोझर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर तालुक्यातील बोराडी गावाजवळ मोठ्या प्रमाणावर झोपड्यांचे अतिक्रमण झाल्यामुळे त्या ठिकाणी वन विभागातील अधिकारी व सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी कर्मचारी यांनी अतिक्रमण धारकांशी चर्चा करून सदरील अतिक्रमण स्वतःहून काढण्याच्या सूचना केल्या. स्थानिक नागरिकांनी नवीन झोपड्या अवैधरित्या तयार करत असल्याचे मान्य केले व वनविभागातील कर्मचाऱ्यांनी JCB च्या मदतीने झोपड्यांचा सांगाडा काढून घेतला दि. 29 रोजी वनसंरक्षक धुळे (प्रा.) मा. श्रीमती निनू सोमराज, मा. श्री अभिनव गोयल जिल्हाधिकारी धुळे, मा. श्रीकांत धिवरे पोलीस अधीक्षक धुळे, मा. श्री. नितीन कुमार सिंग उपवनसंरक्षक धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक वनसंरक्षक श्री मंगेश कांबळे यांनी निर्गमित केलेल्या आदेशान्वये बोराडी वन क्षेत्रातील नियत क्षेत्र गधडदेव मधील कंपार्टमेंट राखीव वनक्षेत्रातील 4.15 हेक्टर वर अवैधरित्या नवीन तयार करीत असलेल्या 70 झोपड्या हटविण्यात आल्या. सदर अतिक्रमण निष्कासीत करतेवेळी उप वसंरक्षक मा.श्री. नितीन कुमार सिंग, विभागीय वन अधिकारी मा. श्री राजेंद्र सदगीर, उप विभागीय पोलिस अधिकारी मा. श्री. भागवत सोनवणे,सहायक वनसंरक्षक मा. मंगेश कांबळे, पोलीस निरीक्षक श्री. जयपाल हिरे, बी.बी. थोरात, श्री दीपक



पाटील,वनपरिक्षेत्र अधिकारी बोराडी श्री. किरण गिरवले व नायब तहसीलदार मा.श्री पेंढारकर यांनी अतिक्रमण धारकांशी चर्चा करून सदरील अतिक्रमण स्वतःहून काढण्याच्या सूचना केल्या. अतिक्रमण धारकांनी सदरील नवीन झोपड्या अवैधरित्या तयार करत असल्याचे मान्य केले. अतिक्रमण धारकांनी त्यांचे मौल्यवान साहित्य स्वतःहून काढून घेतल्यानंतर वनविभागातील कर्मचाऱ्यांनी JCB च्या मदतीने झोपड्यांचा सांगाडा काढून घेतला व लाकडाच्या दांड्याचा मुद्देमाल जप्त केला. सदर अतिक्रमण काढतेवेळी धुळे वन विभागातील 7 वनपरिक्षेत्र अधिकारी व 120 कर्मचारी तसेच धुळे पोलीस दलातील 22 अधिकारी व 215 पोलीस कर्मचारी,4 QRT टीम, SRPF तुकडी, दामिनी पथक तसेच महसूल विभागाकडून मंडळ अधिकारी, तलाठी हजर होते.

# खा. लंके यांनी घेतली नितीन गडकरी यांची भेट

## नगर-मनमाड रस्त्यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**नगर :** बहुचर्चीत नगर-मनमाड रस्त्याच्या रखडलेल्या दुरूस्तीसंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची मंगळवारी नवी दिल्ली येथे भेट घेतली. या रस्त्याच्या रखडलेल्या कामासंदर्भात गडकरी यांनी पुढील आठवडयात रस्ते वाहतूक मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक बोलविण्यात आल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

नगर-मनमाड तसेच नगर-पाथर्डी या दोन्ही रस्त्यांची दुरावस्था झाल्याने त्यांची दुरूस्ती करण्याच्या मागणीसाठी खा. लंके यांनी मागील वर्षी उपोषण केले होते. त्यावेळी महाविकास आघाडीचे तत्कालीन नेते अजितदादा पवार यांनी उपोषणाच्या चौथ्या दिवशी नगर येथे येत शिष्टाई करीत हे आंदोलन मागे घेण्यास भाग पाडले होते. त्यावेळी पवार यांनी थेट नितीन गडकरी यांच्याशी संपर्क करून लंके यांच्या या आंदोलनात तोडगा काढला होता. गडकरी यांनी पवार यांच्यासह लंके यांच्याशीही चर्चा करून विशेषतः नगर-पाथर्डी रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याची ग्वाही दिली होती. व हे लगेच सुरू होऊन पुर्णही झाले होते. नगर-मनमाड रस्त्याचेही काम सुरू झाले मात्र ते पुन्हा थंडावल्याने नागरीकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात येत होती.

लोकसभा निवडणूकीदरम्यान राहुरी मतदारसंघात नगर-मनमाड रस्त्याच्या दुरावस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. खा. लंके यांच्याकडूनही या रस्त्याच्या दुरावस्थेस तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे हेच जबाबदार असून त्यांच्या घराकडे जाणारा रस्त्याही त्यांना करता आला नसल्याची टीका त्यांनी त्यावेळी वारंवार केली होती.



दरम्यान, खा. नीलेश लंके हे संसदेमध्ये शपथ घेण्यासाठी गेले होते त्यावेळीही नितीन गडकरी यांची संसदेच्या आवारात त्यांची भेट झाली होती. त्याच वेळी लंके यांनी नगर-मनमाड रस्त्याच्या कामाविषयी गडकरी यांच्याकडे तक्रार केली होती. त्यावेळी गडकरी यांनी कार्यालयात येऊन त्यासंदर्भात निवेदन देण्याबाबत सुचित केले होते. गडकरी यांच्या सुचनेप्रमाणे खा. लंके यांनी नगर-मनमाड रस्त्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयात जाऊन निवेदन सादर केले. या रस्त्यावर शेकडो प्रवाशांचे बळी गेले असल्याचे लंके यांनी मंत्री गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिले. याच मार्गाने शिर्डीच्या साईबाबांच्या दर्शनासाठी देश विदेशातील भाविक जात असतात. या भाविकांनाही खराब रस्त्यामुळे मनःस्ताप सहन करावा लागत असल्याचेही लंके यांनी गडकरी यांना सांगितले. त्यावर गडकरी यांनी पुढील आठवडयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करण्याच्या सुचना संबंधितांना दिल्या. या बैठकीस खा. लंके हे देखील उपस्थित राहणार आहेत.

**माझी मदत असेल :** एका सामान्य कुटूंबातून संसदेत आलेल्या खा. नीलेश लंके यांना त्यांच्या मतदारसंघातील कामांसाठी माझी नेहमी मदत राहील अशी ग्वाही मंत्री गडकरी यांनी यावेळी बोलताना दिली. माझ्या खात्याअंतर्गत येणाऱ्या कामाचे प्रस्ताव सादर करा, त्यास प्राधान्याने मंजुरी देण्याची ग्वाही गडकरी यांनी यावेळी दिली. **खा. नीलेश लंके**

# पंढरपूरला जाणाऱ्या वाहनांना आजपासून टोलमाफी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अवघ्या महाराष्ट्राला पांडुरंगाचे वेड लागलं असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरीच्यादिशेने टाळ-मृदुंगाचा गजर करत, मुखी हरीनाम जपत दिंड्या पंढरीकडे निघाल्या आहेत. ऊन, पाऊस, वाऱ्यासह निसर्गाच्या विविध संकटांचा सामना करत वारकरी पंढरीकडे पाऊलं टाकत आहेत. तर, एसटी महामंडळानेही हजारो बस पंढरीच्या वारीसाठी सोडल्या आहेत. याशिवाय खासगी वाहनांचीही मोठी संख्या पंढरपूरकडे ये-जा करत असते. वारीच्या कालावधीत पंढरीत लाखो वैष्णवांचा मेळा जमतो. कार, बससह विविध वाहनांतून वारकरी, भाविक भक्त मोठ्या संख्येने चंद्रभागेच्या तिरी जमतात. या भाविकांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी वारीसाठी येणाऱ्या-जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी देण्यात आली आहे. आजपासून 21 जुलैपर्यंत ही टोलमाफी असणार आहे.

कोकणातील गणेशोत्सवाप्रमाणे पंढरपूर येथे आषाढीच्या वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या वाहनांना टोल माफ करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गतवर्षी जाहीर केला होता. कोरोनामुळे दोन वर्षे खंड पडल्यामुळे गतवर्षी वारकऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचं दिसून आलं, त्याचा विचार करून सरकारने गतवर्षी वारीसाठी येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी केली होती. आता, यंदाही राज्य सरकारने टोलमाफीचा निर्णय घेतला असून आजपासूनच पंढरपूरकडे जाणाऱ्या वाहनांना टोलमाफीचा लाभ मिळणार आहे. पंढरपूरला आषाढी कार्तिकी निमित्त जाणाऱ्या व परत येणाऱ्या पालख्या आणि वाहनांना पथ करातून सूट देण्यात आली आहे. वारीत सहभागी असलेल्या वारकऱ्यांच्या वाहनांसाठी परिवहन विभागातून आवश्यक स्टीकर्स दिले जाणार आहेत. विशेष म्हणजे 3 जुलै ते 21 जुलै या कालावधीत पंढरपूरला जाणाऱ्या आणि पंढरपूरहून गावी जाणाऱ्या सर्वच वाहनांना ही सवलत असणार आहे. दरम्यान, गरज पडल्यास सुरक्षित व सुरळीत वाहतूकीसाठी वारीतील वाहने सोडून अवजड वाहनांना वारी मार्गावर बंदी घालण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. महामंडळाच्या बसेसनाही टोलमाफी महाराष्ट्र राज्यातून पांढरपूरकडे येणारे सर्व पथकर नाक्यांवर उपरोक्त कालावधीत पथकर माफी नसलेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसनाही पथकरातून सूट देण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत.

यावर्षी आषाढी एकादशी 17 जुलै रोजी होत असून यात्रेत यंदा प्रथमच अगदी भंडीशेगावपासून पंढरपूर शहरापर्यंत ठिकठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार आहे.

यंदाची आषाढी एकादशी आजपर्यंतच्या आषाढीतील बेस्ट असेल असा विश्वास सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी एबीपी माझाशी बोलताना व्यक्त केला. यावर्षी प्रथमच भंडीशेगाव , वाखरी या पालखी मार्गावरील इमारती , झाडांना आकर्षक विद्युत रोषणाई करून लाखो भाविकांचे स्वागत केले जाणार आहे. यानंतर पालखी सोहळे पंढरपुरात पोचल्यावर इसबावी , कॉलेज चौक , चंद्रभागा वाळवंट , भाविकांचे निवासस्थळ असणारे 65 एकरावरील भक्तिसागर अशा विविध ठिकाणी हे आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार आहे. यासाठी विविध जागांची पाहणी केली असून पालखी सोहळे येण्यापूर्वी ही विद्युत रोषणाई पूर्ण केली जाणार आहे.

## कुलविंदर कौर यांची बदली

आधुनिक केसरी

हिंदी सिनेमातील अभिनेत्री आणि भाजपाच्या खासदार कंगना रणौत यांना चंदीगढ विमानतळावर कानशिलात लगावणाऱ्या सीआयएसफ कॉन्स्टेबल कुलविंदर कौर यांची बदली करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या पतीचीही बदली करण्यात आली आहे. चंदीगढ विमानतळावर कंगना रणौत यांना कानशिलात लगावल्यानंतर कुलविंदर कौर यांना निलंबित करण्यात आले होते. आता त्यांना नोकरीवरुन परत घेण्यात आले आहे तसेच त्यांची बदली करण्यात आली आहे. कुलविंदर कौर यांची बंगळुरुला बदली करण्यात आली आहे. खासदार कंगना रणौत यांना कानशिलात लगावल्यामुळे कुलविंदर कौर चर्चेत आल्या होत्या. कंगना रणौत यांना का मारले? याचे कारण सांगताना कुलविंदर कौर यांनी व्हिडिओ पोस्ट केला होता. त्यात त्या म्हणाल्या कंगना रणौत म्हणाल्या होत्या की १००-१०० रुपये घेऊन शेतकरी आंदोलनात महिला बसल्या आहेत. त्यावेळी आंदोलनात माझी आईही होती. तसेच कंगना रणौत असेही म्हणाल्या होत्या की या खलिस्तान्यांना इंदिरा गांधींनी मच्छरांप्रमाणे संपवले होते. हे बोलल्याने संताप अनावर झाला आणि मी कंगना यांना कानशिलात लगावली. असे या महिलेने म्हटले होते. कंगना रणौत या मंडीमधून निवडणूक जिंकून आल्या आहेत. त्यानंतर कंगना लोकसभेत होणाऱ्या कार्यक्रमासाठी चंदीगढ विमानतळावरुन दिल्लीला जात होत्या. त्या चंदीगढ विमानातळावर आल्या तेव्हा कर्टन रुममध्ये कुलविंदर कौर यांनी त्यांच्या कानशिलात लगावली. या घटनेनंतर कंगना रणौतही चिडल्या होत्या. त्यांनी या महिला कॉन्स्टेबलशी वाद घातला होता. तसेच त्यांनी या प्रकरणी CISF च्या उच्च अधिकाऱ्यांची भेट घेतली. ज्यानंतर कुलविंदर कौर यांचं निलंबन करण्यात आले होते. आता कुलविंदर कौर यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे. तसेच त्यांची बदली बंगळुरुला करण्यात आली आहे. कंगना रणौत यांच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप असलेल्या कुलविंदर कौर या सीआयएसफमध्ये कॉन्स्टेबल आहेत. त्या ३५ वर्षीय आहेत. त्यांचे कुटुंब सुल्तानपूर येथील लोधी या ठिकाणी राहतं. मागच्या १५ वर्षांपासून कुलविंदर कौर या सीआयएसएफमध्ये काम करतात. आजवर त्यांच्या कारकिर्दीला कुठलाही कलंक लागलेला नाही.

## बार-पब क्लबची विकृती

आधुनिक केसरी



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

**गेल्या महिना दीड महिन्याच्या काळात पुणे, जळगाव, नागपूर आणि अजून काही ठिकाणी मद्यधुंद अवस्थेत कार ड्रायव्हिंग मुळे अनेक लोकांचे बळी गेलेत. आठ ते दहा लोकांचे मृत्यू है केवळ नशे मध्ये कार ड्रायव्हिंग ने झालेले आहे. या प्रकरणात अनेक गोष्टी पुढे आल्या आहेत आणि आता त्याच्यावर मंथन सुरू आहे तपास सुरू आहे. आणि त्यातून या कार चालकांना कसे वाचवता येईल यासाठी काय काय प्रकार झाले हे सुद्धा समोर आलेले आहे. जळगावची घटना आधी घडलेली होती,त्यात चौघांचे जीव गेले. परंतु पुण्याची घटना घडल्यानंतर जळगावच्या आरोपींना 17 दिवसानंतर पोलिसांनी ताब्यात घेतले.**

पुण्याचेही आरोपींना बऱ्याच वेळानंतर ताब्यात घेण्यात आले. त्याचवेळी नागपूरलाही अशीच घटना घडली आणि त्यात नऊ लोक चिरडले गेले त्यातील दोघांचा मृत्यू झाला काल परवाची घटना आंबेजोगाईजवळ दोन स्त्रिया रस्ता ओलांडताना उडवल्या गेल्या व जागीच मृत्यू झाला. मद्यपान करून कारड्रायव्हिंग करण्याचे प्रकार बऱ्याच प्रमाणात घडत आहेत. आपण बघतो बऱ्याच वेळा रस्त्याने गाड्यांचे चेकिंग होते त्यावेळेला पीयूसी, ड्रायव्हिंग लायसन्स, गाडीची क्षमता हे बघितले जाते. पण अशावेळी तो कार चालक नशेत आहे का हे मात्र बघितले जात नाही. जळगावच्या प्रकरणात गाडीमध्ये दोघेही नशेत होते संशय व्यक्त होतो आहे. गाडीत गांजा वगैरे सारखे तत्सम नशा युक्त पदार्थ सापडले तसेच तो राजकीय नेत्याचा मुलगा होता. पुण्याच्या कल्याणी नगर भागात झालेल्या पोर्शे कार प्रकरणातही कार चालवणारा मुलगा हा मोठ्या बिल्डरचा मुलगा असून नशेत मध्ये होता,अल्पवयीन होता, कारला नंबर प्लेट नव्हती, तसेच पब मधून आलेले होते. नागपूरच्या दिघोरी नाक्या जवळील घटनेत दोन मजूर एक बालक मृत्यु मुखी पडले त्यात सात मजूर गंभीर जखमी झाले. नागपूरच्याच झेंडा चौक भागात अशाच भरधाव कारने तिघांना जखमी केले त्यातही कारचालक नशेत असल्याचे उघड झाले आहे. फर्ग्युसन रोड व पुणे नगर रोडवरील अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचे व्हिडिओ समोर आलेले आहेत.उल्हासनगर येथेही एका किराणा दुकानात साडेचार कोटी चे अमली पदार्थ सापडले. प्रश्न निर्माण होतो, कुठे चालली आहे तरुणाई.?? अशा प्रकरणांमध्ये मोठ्या व्यक्तीचा मुलगा वगैरे असेल तर तो गुन्हा त्याचे कडून झालेला नाही हे दाखवण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात येतात जसे रक्ताचे नमुने घेणे तो मुलगा कार ड्रायव्हिंग करतच नव्हता गाडीवर ड्रायव्हर होता अशावेळी ड्रायव्हर वर दबाव आणून त्याला अमिष दाखवणे किंवा तपास कामात दिरंगाई करणे साठी दबाव आणणे. अशा अनेक गोष्टी या प्रकारातून समोर आलेले आहेत,आरोप प्रत्यारोप होत आहेत. बार पबसाठी रात्रीची एक ची वेळ ठरवून दिलेली असूनही एकवाजे नंतरही त्यामध्ये अनेकांना प्रवेश दिला जातो आणि असे पब रात्रभर सुरू असतात त्यात बरेच 18 वर्षाखालील अल्पवयीन मुल, मुली असतात हेही समोर आलेले आहे आणि अशा नाईट लाईफचा आनंद घेत असताना अशा अवस्थेत ड्रायव्हिंग करणाऱ्या मुला मुलीकडून असे अपघात घडतात. नुसते अपघातच नाही तर अनेक अत्याचाराच्या घटना घडत असतात या निमित्ताने आता मोठमोठ्या शहरांमध्य पब ,बार क्लब, लॉउंज, रूफटॉप रेस्टॉरंट यावर कारवाई सुरू झाली आहे.मुख्यमंत्री, गृहमंत्री यांच्या आदेशानुसार पुण्यात १८९ पब,बार वर कारवाई करून ६९ चे परमीट निलंबित, तर ६ चे परमीट रद्द केले अशी माहिती प्रसिद्ध झाली आहे. पण आतापर्यंत अशा गोष्टींकडे सोयीस्कर रित्या दुर्लक्ष केले जात होते असे म्हटल्यास वावगे होणार नाही. शिक्षणा साठी मुलं राज्यातून, परराज्यातून लाखोच्या संख्येने इथे येतात. पुढे आता उद्योगधंद्याचे कंपन्यांचे मोठे क्षेत्र बनले आहे त्यामुळे त्यासाठी सुद्धा लाखोच्या संख्येने मुलं-मुली कंपनीमध्ये नोकरी करतात ते सुद्धा महाराष्ट्रभरातून तसेच इतर राज्यातून आहे आलेली असतात. कंपनीमध्ये काम खूप करावे लागत असल्याने त्यांना एक प्रकारचा स्ट्रेस येतो आणि तो घालवण्यासाठी वीकेंडला ते अशा बार, पब, रूफटॉप रेस्टॉरंट, कडे धाव घेतात आणि आपला कामाचा ताण घालवायला पाहतात. वीकेंडला अशा प्रकारचा कार्यक्रम हे एक व्यसनच बनून राहिले आहे. त्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. काही ठिकाणी दारू बियर बरोबर अमली पदार्थांचे सेवन होते तसेच नाच गाणे आणि इतरही कार्यक्रम होत असतात. त्यासाठीच बऱ्याच ठिकाणी पहाटेपर्यंत ही ते खुले असतात. अशा ठिकाणी वय वगैरे काही बघितले जात नाही आणि बराच वेळा अल्पवयीन मुलांनाही प्रवेश दिला जातो. मुलांबरोबर मुलीही स्मोकिंग आणि मद्यपान करीत असतात.

आपला मुलगा काय करतोय ? आपली मुलगी काय करतेय ? ह्याकडे पालकांनी लक्ष द्यायला हवे. सगळ्याच बाबतीत पोलीस प्रशासनाला दोष देऊन चालणार नाही. पुणे ही महाराष्ट्र राज्याची सांस्कृतिक राजधानी म्हटली



जाते. शिक्षण पंढरी म्हटली जाते. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ या पुण्यनगरीतच झाली आहे. कला, क्रीडा, शिक्षण, साहित्य,संगीत नाटक, ही पुण्याची विशेषता आहे. पुण्यनगरीने अनेक सांस्कृतिक गोष्टींचा वारसा जपला आहे. पुण्यातील देहू ही संत तुकाराम महाराज यांची व आळंदी ही संत ज्ञानेश्वर महाराजांची जन्मभूमी आहे. पुणे म्हटले म्हणजे बाळ गंगाधर टिळक, आगरकर आणि गोपाळकृष्ण गोखले आठवतात.बरेच संशोधक हे ही पुण्यातीलच आहेत. पुणे हे भारतीय शास्त्रीय संगीतासाठी अतिशय प्रसिद्ध आहे. दर वर्षी डिसेंबर महिन्यात तीन दिवस " सवाई गंधर्व " हा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम आयोजित केला जातो.त्यासाठी अनेक ठिकाणाहून रसिक हजेरी लावतात. पुणे फेस्टीवल. पुण्याचा गणेशोत्सव संपूर्ण जगामध्ये प्रसिद्ध आहे. पूज्य माधवनाथ महाराजांच्या सांगण्यावरून स्थापलेला श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती. गणपती व दत्त मंदिर तसेच पेशवे कालीन सारसबागेतील सिद्धिविनायक गणपती मंदिर आणि गड किल्ल्यांनी वेढलेली ही पुण्यनगरी. अशा या पुण्यनगरीला बार -पब च्या विकृतीमुळे अमली पदार्थाच्या सेवनाने कुठेतरी कमीपणा येतो आहे असे जाणवते. आपल्या एका लेखात मानसतज्ञ व समुपदेशक आरती पेंडसे म्हणतात...

"बदललेली जीवनशैली हाय सोसायटी च्या भलत्याच कल्पना, पब संस्कृती, गर्लफ्रेंड- बॉयफ्रेंड आदी गोष्टींनाच मॉडर्न समजणे यामुळे आपल्या कुटुंब संस्थेची अवस्था भयानक झाली आहे .संवाद कमी झाला आहे. मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. आपला मुलगा दारूची पार्टी करतो, मुलगी तिच्या फ्रेंड्स बरोबर नाईट आउट करते .हे सांगण्यातच धन्यता पालकांना वाटत असेल तर या मुलांना दोष कशाला द्यायचा ? मी कसाही वागलो /वागले तरी माझी आई वडील मला वाचवायला येणारच याची खात्री असल्याने ही असली जीव घेणारे थ्रिल अनुभवण्याची मस्ती करता येते. जिथे कायदा मोडणे आणि त्यातून सुटणे हे सामर्थ्याचे लक्षण समजले जाते तिथे अशा घटना घडणारच. सध्याच्या मुलांमध्ये व्यसनाधीनता आणि किशोर वयातील लैंगिक संबंधाचे प्रमाण खूप वाढले आहे. याचे कारण व्यसनांनी प्राप्त झालेल्या वलय. परवाच पुण्यामध्ये एक परिसंवाद झाला आणि त्याचा विषय होता "पुणे- शिक्षणाचे माहेरघर का व्यसनांचे आगार" आहे ? एकूणच माणसाच्या जगण्याची जीवनमूल्य बदलत आहे आणि नाही त्या गोष्टींनी प्रतिष्ठेची जागा घेतली आहे. असंवेदनशील राजकारणी, भ्रष्ट नोकरशाही, आणि आत्ममग्न समाज, हेच या अधःपतनाला जबाबदार आहेत असे विचार प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी मांडले. तर माध्यमांचा वापर म्हणजेच मोबाईलचा वापर कसा करावा आणि कितपत करावा याबाबतीत आई-वडीलही अनभिज्ञ आहेत आणि म्हणूनच मुलांच्या हाती खेळण्यासारखा मोबाईल दिल्यामुळे पुढील परिणाम काय होतील याचा विचार करत नाही. त्याचेच रूपांतर पुढे व्यसनात व्हायला वेळ लागत नाही. म्हणून पालकांनीही वेळीच खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्याचा वापर कसा करावा हे तर आपल्या हाती आहे. तरी पण त्याकडे दुर्लक्ष होते.असा विचार मुक्ता चैतन्य यांनी मांडला. एकूणच पुण्याची ओळख 'उडते पुणे" असा होऊ नये अशी अपेक्षा परिसंवादात व्यक्त करण्यात आली. एका मुलाखतीत खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या- की पुण्याची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न हाणून पडला जाईल तसेच "पब संस्कृतीचे" उच्चाटन केले जाईल. त्यासाठी शासन प्रशासन प्रयत्नशील राहील. आरती पेंडसे यांनी सुद्धा पब संस्कृती असा उल्लेख केला आहे. प्रश्न हा की पब ही संस्कृती कशी ? ती तर विकृती आहे. संस्कृती म्हणजे मानसिक उन्नतीचा दर्शक असा जीवनक्रम किंवा आदर्श वर्तनपद्धती.' संस्कृती म्हणजे ज्यात ज्ञान, श्रद्धा, कला, नीती, कायदा, रूढी या व अशा गोष्टींचा यात समावेश होतो आणि या गोष्टी व्यक्तीने समाजाचा भाग या नात्याने स्विकारल्या असतात. सिंहगडच्या पायथ्याशी शेकडो मुला मुलींची ड्रग्स पार्टी पकडली त्यावेळेला असंख्य पालकांनी त्या ठिकाणी धाव घेतली आणि पोलिसांना दम देत होते की मुलांनी ह्या गोष्टी ह्या वयात करायच्या नाही तर मग केव्हा करायच्या ? अशा पालकांकडून चांगल्याची काय अपेक्षा करायची. आणि आता वडीलच आपल्या अल्पवयीन मुलाला नंबर प्लेट नसलेल्या गाडीची चावी देतात... मग आता सांगा पालकांनी जर अशी भूमिका घेतली तर मग हे पब,बार प्रकरण आणि अमली पदार्थांचे सेवन कसे बंद होईल हा मोठा प्रश्न आहे.??? तरुणाईची अशी वाताहत होणे सर्वच दृष्टीने परवडणारे नाही हे मात्र नक्की.

## जीवन अज्ञानमुक्त होईल एवढं ज्ञान आवश्यक

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

**जीवनाची खरीखुरी फसगत हि अज्ञानामुळे होत असते.अज्ञान समुळ नष्ट झाल्या खेरीज गत्यांतर नसतं. ज्ञान समुद्रातील एक प्याला ज्ञान मिळविण्यासाठी कित्येक जन्म अपुरे पडतील एवढा ज्ञानाचा महासागर अस्तित्वात आहे.जीवनाची गरज पाहता वेगवेगळ्या प्रकारच्या ज्ञानापैकी अज्ञाना च्या समुद्रातील नौका पैलतीरावर घेऊन जाईल एवढं ज्ञान तर आपल्यासाठी जीवनावश्यक आहेच.पण जशी अडचण तशी ज्ञानाची आवश्यकता असते. म्हणून प्रत्येकाच्या जीवनातील ज्ञानाची गरज हि वेगवेगळी असु शकते.व्यक्तीपरत्वे हि गरज आणि मर्यादा बदलत असते. ज्ञानाची उपलब्धता पाहता व्यवस्थित जीवन व्यतित करण्यासाठी अज्ञानाचा समुळ नाश होईल एवढं ज्ञान पुरेसं असु शकत.**

सर्वसाधारण जीवनात किती ज्ञान अपेक्षित आहे.याचा सारासार विचार केलातर आपण आयुष्यभर ज्ञान अर्जित केले तरी ज्ञान संपणार नाही. एवढी ज्ञानाची प्रचंड मोठी व्याप्ती आहे.ज्ञान हे अमर्याद असतं जसा समुद्र विशालकाय आहे. तसंच ज्ञान पण विशालकाय असतं म्हणून किती हि ज्ञान मिळवलं तरी आपली ज्ञान भुक पुर्ण होऊ शकत नाही. एवढी ज्ञानाची अमर्याद अवस्था आहे.परंतु जीवनाच्या रंगमंचावर अज्ञानाचा समुळ नाश होईल एवढं ज्ञान मिळाल तरी पुरेसं आहे.ज्ञानी होण्यासाठी फार काही करण्याची आवश्यकता नसते.ज्ञान आणि अज्ञान यातील फरक समजला पाहिजे. अज्ञानाला समुळ नष्ट करता येईल एवढं माफक ज्ञान असल तरी पुरेसं ठरतं.आपल्या जीवनातील अज्ञान रूपी जळमटं दुर करण हि काळाची गरज असते.गर्द अशा काळोखाच्या रात्री येणार्या अंधाराचा समुळ नाश झाल्यानंतरच भव्य दिव्य अशा नव्या किरणांची सकाळ होऊन स्वच्छ असा सुर्य प्रकाश दिसतो जस सुर्याच्या मधे येणारा ढग बाजुला झाल्यानंतरच आपल्याला सुर्यच अ प्रतिम तेज दिसते.याच प्रमाणे अज्ञानाचा समुळ नायनाट झाल्याखेरीज किंवा अज्ञान हे मुळा सकट संपुष्टात आल्यखेरीज व्यवस्थित जीवनाचा मार्ग दिसत नाही.म्हणून मुख्यत्वे ज्ञान म्हणजे काय हा जरी विशालकाय प्रश्न असला आणि प्रत्येकाच ज्ञानावरील मत हे जरी वेगवेगळ असल तरी तसं असणं ते स्वभाविक नैसर्गिक आहे .कारण ज्ञानाची निश्चित अशी व्याख्या करता येत नाही.ज्ञान हे अमर्याद आहे.जसं समुद्राची लांबी रुंदी आणि खोली मोजता येत नाही.त्याच बरोबर सुर्याचे तेज देखिल मोजता येत नाही.तसंच ज्ञानाच आहे ज्ञान हे अमर्याद स्वरूपात आहे. कारण ज्ञान हे जीवनाच्या रंगमंचावर जीवन रुपी नावेतुन पैलतीरावर जात असताना जो अज्ञान रूपी अंधकार भ्रम वादळं निर्माण होत.आणि या वादळाने अज्ञानाने जीवनात अनेक प्रिय अप्रिय घटना घडामोडी घडतात.किंवा अशा घटनांना आपल्याला सामोरे जावे लागत असते. मुळात जीवनाला अस्थिर करणार हे अज्ञान समुळ नष्ट होण म्हणजेच ज्ञान सत्याचा बोध होणं व सत्य स्वीकारण म्हणजे ज्ञान मुख्यत्वे अज्ञानाचे दोन प्रकार आहेत त्यातील एक म्हणजे व्यक्तिगत अज्ञान ज्या मध्ये सत्या पासून दुर जाण तसेच अनेक भ्रम निर्माण होऊन जीव दुःखाच्या चक्रव्यूहात आडकण म्हणजे अज्ञान,भ्रमाचा मृगजळ भासण व दिसण म्हणजे अज्ञान, सद्सद्विवेक जागृत नसणं म्हणजे अज्ञान ,दुःखाच्या छायेत जाण म्हणजे अज्ञान,शाश्वत आणि भौतिक यामधील अंतर न कळण म्हणजे अज्ञान,एकंदरीत जीवनाच्या वाटेवर नको असलेल्याला किंवा यशस्वी जीवनासाठी हानिकारक बाबींच गाठोड ओझ घेउन फिरणं म्हणजे अज्ञान आणि या ओझ्याखाली आपण इतकं डुबतो कि पुन्हा उभा राहण्याची ताकद शक्ती राहत नाही.हे असणार अज्ञान आणि या अज्ञानाचा समुळ नायनाट कराता येण म्हणजेच ज्ञान तसंच दुसरा प्रकार म्हणजे सामाजिक स्तरावरील अज्ञान ज्या सामाजिक अज्ञान ,रूढी परंपरा,धार्मिक अज्ञान, व्यवहारातील अज्ञान,नाते संबंधातील अज्ञान म्हणजे पृथ्वीवरील प्रत्येक बाबी मध्ये ज्ञान आणि अज्ञान अशा दोन बाबी सामावलेल्या आहेत . त्यापैकी एक बाजू म्हणजे अज्ञान ती समुळ नष्ट होण किंवा ती आपल्याला न जाणवण दिसण म्हणजेच ज्ञान पण हे ज्ञान एवढं सहज उपलब्ध आहे का,?

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अडवणूक, दिरंगाई, पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई

## योजनेच्या पारदर्शक, गतिमान अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, अर्ज भरुन घेणे यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास, प्रक्रियेत दिरंगाई केल्यास किंवा योजनेच्या लाभासाठी महिलांकडून पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्सनास आल्यास अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे



आणि जलदगतीने होईल यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे, या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले आहेत.

त्याचबरोबर योजनेसंदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे किंवा फॉर्म भरुन देण्याचे निमित्त करुन निर्माण होणारे दलाल अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. एखाद्या कार्यालयात असा प्रकार निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुखावर तसेच दलालांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

योजनेसाठी नावनोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेच्या लाभासाठी पात्र महिलांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देणे तसेच त्यानंतर योजनेचा फॉर्म भरणे इत्यादी संपूर्ण प्रक्रियेसंदर्भात काल विधानभवन येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करुन योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि जलदगतीने होईल यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. माता-भगिनींचे आयुष्य बदलवून टाकणाऱ्या विविध योजना राज्य शासनाने आणल्या आहेत. मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णयही लगेचच काढण्यात आला. या योजनेतील पात्र महिलांना महिन्याला दीड हजार रुपये म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये राज्य सरकार देणार आहे. यासाठी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना म्हणजे माता-भगिनींना माहेरचा आहेर आहे. नोंदणीसाठी रांगा लावण्याची गरज पडणार नाही, यादृष्टीने चोख नियोजन करावे, लाडक्या बहिणींची कोणत्याही कारणास्तव अडवणूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



# वृद्धाश्रमात अन्नदान करून शालेय विद्यार्थ्यांना देण्यात आली दप्तरांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** एखाद्या व्यक्तीच्या मनात समाजकार्य करायची जर प्रबळ इच्छाशक्ती असेल तर समाज्यात अशी अनेक माध्यमं आहेत कीं त्या माधायमातून आपण कोणतंही समाजकार्य करू शकतो ! आणि ह्याच प्रबळ ईच्छाशक्तीचा प्रत्यक्ष प्रत्यय आज पाहायला मिळाला तो एका भावाने आपल्या स्वर्गीय भावाच्या जन्मदिनाचं औचित्य साधत एक प्रेरणादायी समाजकार्य करत समाज्यापुढे एक आदर्श निर्माण केला ! तो म्हणजे आपल्या स्वर्गीय भावाच्या म्हणजेच स्वर्गीय कु.अमितदादा पालकर त्यांच्या पवित्र आठवणींचा सुगंध सदैव त्यांच्या अविरत कार्यातून दरवळत राहावा याच उदात्त भावनेतून त्यांचे बंधूराज अमोघदादा पालकर पुतणी कु.दुर्वा पालकर आणि बिग बॉस ग्रुप वेश्वी उरण यांच्या माध्यमातून एक प्रेरणादायी कार्य साकारण्यात आले ते म्हणजे सलग दहाव्या वर्षी रा.जि.प.शाळा वेश्वी येथील १५० विद्यार्थ्यानां आणि वेश्वी आदिवासीवाडी येथील शाळेतील ५० विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. त्यातूनच त्या विद्यार्थ्यांकरिता दिलेला मदतीचा हात त्यांना खूप मोलाचं ठरेल त्यातूनच त्यांच्या शालेय अभ्यासात प्रगती होण्याकरिता मदत होईल तेवढं मात्र नक्की ! सोबतच नेरे - भानघर येथील करूणेश्वर वृद्धाश्रमातील आजी- आजोबांना स्वादिष्ट असं जेवणं देऊन अन्नदानाचं पुण्यकर्म करून त्या निरागस निर्मल आजी - आजोबांचे आशीर्वाद त्यांच्या पुढील आयुष्यात कामी येतील.आणि हे सर्व पाहता अमोघदादा पालकर यांनी आपल्या भावाच्या म्हणजेच कै.कु.अमितदादा पालकर यांच्या आठवणींच्यां स्मृती सामाजिक कार्याच्या माध्यमातून अखंड तेवत ठेवल्या आहेत.

रा.जि.प.शाळा वेश्वी वेश्वी आदिवासीवाडी शाळा आणि नेरे - भानघर करूणेश्वर वृध्दाश्रम येथे साकारलेल्या ह्या प्रेरणादायी कार्यक्रम प्रसंगी स्वर्गीय कु.अमितदादा पालकर यांचे बंधुराज अमोघदादा पालकर, कैलासदादा पालकर,महेशदादा पालकर,शरददादा पालकर, सोबतच बिग बॉस ग्रुपचे अक्षय पाटील, नितेश मुंबईकर, राकेश पाटील, प्रणित कडू,परम पाटील, कल्पेश पाटील, रोशन पाटील केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक रायगड भूषण राजू मुंबईकर , केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष स्नेहल पालकर आदी मान्यवर उपस्थित होते.सोबतच करूणेश्वर वृध्दाश्रमातील करुणाताई ढोरे,ईश्वरदादा ढोरे,वेश्वी शाळेतील सर्व शिक्षकवृंद विद्यार्थीवर्ग यांच्या उपस्थितीत हा सुंदर आणि प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या उत्साहात उत्तम प्रतिसादात संपन्न झाला.

# कोट्यवधींची जमीन हडप करून शासनाची फसवणूक : भगवान करनकाळ

## सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळाने भ्रष्टाचार केल्याचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या भ्रष्टाचारासंदर्भात माजी महापौर भगवान करणकाळ यांनी प्रांत अधिकारी यांना निवेदन देण्यात आले निवेदनात असे म्हटले आहे की धुळे देवपूर येथील सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ विद्यावाडी धुळे ची जमीन नऊ हेक्टर भाड्या तत्त्वावर दिलेली असताना सन 2002 मध्ये मान्य जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने शर्तभंग झाल्याने जप्त करण्यात आली होती. परंतु देवपूर तलाठी व सिटी सर्वे मध्ये एक रुपया न भरता फुकतात वरील विद्यालयाचे नाव आज पण असून माननीय जिल्हाधिकारी धुळे यांच्या वतीने प्रांताधिकारी यांनी चौकशी करावी असे अनेक पत्र व स्मरणपत्रे दिले आहेत या सर्व पत्र नुसार आपण कोणती कारवाई केली व प्रत्यक्ष जाऊन चौकशी केली याचा लेखी खुलासा पंधरा दिवसात द्यावा यासाठी निवेदन देण्यात आले आहे. तसेच वरील शिक्षण संस्थेची दिलीप भिका वाघ व कैलास गर्दी यांनी सन 2021 पासून अनेक लेखी तक्रारी व माननीय लोकायुक्त यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या परंतु लोकायुक्त यांना माजी जिल्हाधिकारी जलज शर्मा व संजय गायकवाड निवासी जिल्हाधिकारी यांनी 8-10 जणांच्या सहीने चुकीचे पत्र दिल्याने लोक आयुक्तांनी दखल घेतली नाही याची आपण सखोल चौकशी करून न्याय द्यावा तसेच सन 2021 पासून तक्रारी असताना तीन ते चार वर्षात आपण स्वस्थळावर जाऊन का चौकशी करीत नाही याचाही लेखी खुलासा आम्हास करावा असे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.



# राम सासवडकर यांचे उकळी येथील आमरण उपोषणाची घेतली दखल

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** तालुक्यातील ग्राम उकळी येथिल ग्रामपंचायत समोर मा.रामेश्वर सासवडकर तीन दिवसापासुन विविध मागण्यांसंदर्भात आमरण उपोषणास बसले होते मात्र आज अचानक त्यांची तब्बेत खालावली असल्याने पंचायत समिती मेहकर येथील संबंधित अधिकारी यांच्या सोबत चर्चा केली व सदर उपोषणाच्या अनुषंगाने ज्या मागण्या केल्या असतील त्या मागण्याची तात्काळ दखल घेऊन सदर उपोषण तातडीने सोडवावे अशी विनंती केली त्या अनुषंगाने विस्तार अधिकारी श्री गवई ग्रामपंचायत सचिव श्री जवळकर सरपंच साहेब पोलीस निरीक्षक कड साहेब यांना घेऊन उपोषण स्थळी दाखल झालो व उपोषणकर्त्याच्या मागणीनुसार तात्काळ लेखी सचिव विस्तार अधिकारी यांचे लेखी देऊन तात्काळ कामे करण्याचे आदेश सचिव यांना देण्यात आले व उपोषणकर्त्याच्या मागण्या लेखी स्वरुपात मान्य करून आज शरबत पाजुन उपोषण सोडवण्यात आले यावेळी स्वाभिमानाचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले युवक कॉंग्रेसचे जिल्हा प्रवक्ते दिलीप बोरे डोणगाव अर्बन अध्यक्ष ऋषांक चव्हाण सलीम शहा साजन शहा ग्रामपंचायत सदस्य दशरथ भाऊ बोरे अमोल बोरे यावेळी असंख्य गावकरी महिला व नागरिकांची उपस्थिती होती.



# माझी लाडकी बहीण योजनेस मंजुरी; आंबेडकरनगरमध्ये मिठाई वाटून जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र सरकारने "माझी लाडकी बहीण" योजनेस मंजुरी देऊन महिलांसाठी मोठा निर्णय घेतल्याबद्दल भारतीय जनता पार्टी च्या वतीने आंबेडकर नगर येथे मिठाई वाटप करुन जल्लोष करण्यात करण्यात आला. यावेळी महिला भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. राज्यसरकारने महिलांसाठी विविध योजना या पावसाळी अधिवेशन दरम्यान जाहीर केल्या. तसेच अर्थ संकल्प मध्ये विशेष तरतूद केल्यामुळे महिला भगिनी अधिक सक्षम पणे आपले काम करू शकतात. राज्य सरकार ने महिलांसाठी जाहीर केलेल्या योजनामुळं प्रत्येक भगिनींनी आनंद व्यक्त केला असून आंबेडकर नगर येथे भारतीय जनता पार्टीचे रवींद्र एडके, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा चे प्रदेश उपाध्यक्ष योगेश दणके, मंडळ अध्यक्ष नितीन खरात, भाजपा पूर्व विधानसभा संयोजक वर्षा साळुंके, सरिता घोडतुरे, लक्ष्मी गायकवाड, अनिता तुपे, संगीता राऊत लता गायकवाड, राजेश मिरकर, अरुण पालवे, गौतम साळवे, राहुल दिवेकर, भाजप ओबीसी मोर्चा सहसचिव संजय जाईबहार, सुभाष लोखंडे, आदींची उपस्थिती होती.

# लोकसभा निवडणुकीत विजय मिळाला तरी लढाई अजून संपलेली नाही : नाना पटोले

## काँग्रेसच्या ५ न्याय व २५ गॅरंटी घरोघरी पोहचवण्यात सेल व विभागाचे मोठे योगदान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेस पक्ष हा सर्व समाजांना सोबत घेऊन जाणारा पक्ष आहे. आगामी निवडणुकीत सर्व समाज घटकाला प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी प्रयत्न केला जाईल. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडीला चांगला विजय मिळाला आहे, आता विधानसभा निवडणुकीतही जिल्हा, तालुका, बुथ स्तरावर असेच काम करा आणि राज्यातील महायुतीचे भ्रष्ट सरकार हटवून महाविकास आघाडीचे सरकार आणा, असे आवाहन प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केले आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात मोठा विजय मिळवल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सेल व विभागाच्या वतीने प्रभारी रमेश चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा सत्कार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सेल व विभागाकडून दादरच्या शिवाजी मंदिर येथे करण्यात आला, यावेळी चेन्नीथला बोलत होते.

या कार्यक्रमात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाने मोठा विजय मिळवला यात प्रदेश काँग्रेसच्या विविध सेल व विभागाचे कार्य महत्वाचे ठरले आहे. या सर्वांनी राज्यातील गावागावात जाऊन काँग्रेसचा विचार पोहचवण्याचे काम केले. तसेच काँग्रेसच्या ५ न्याय २५ गॅरंटीचे न्यायपत्र घरोघरी पोहचवण्याचे काम केले आहे. लोकसभेची लढाई जिंकलेली असली तरी संघर्ष अजून संपलेला नसून विधानसभा निवडणुकीतही असेच काम करुन विजयी पताका फडकवा,असे आवाहन पटोले यांनी केले.




भारतीय जनता पक्षाचे सरकार जनतेत नेहमीच फेक नेरेटिव्ह पसरवत असते. महिलांना आरक्षण देण्याचे विधेयक मोठा गाजावाजा करून मंजूर केले पण त्याची अमंलबजावणी ते करू शकत नाहीत कारण जनगणनाच केलेली आहे. मोफत धान्य देण्याच्या नावाखाली प्लास्टिकचा तांदूळ देऊन गोरगरिब जनतेच्या जीवाशी ते खेळत आहेत. कोरोनाकाळात लस दिली व त्याच्या प्रमाणपत्रावर पंतप्रधानांचा फोटो छापण्यात आला. आता त्या लसीमुळेच लोकांचे मृत्यू होत असल्याचे उघड झाले की भाजपा सरकारने जबाबदारी झटकली. भाजपाचे सरकार फक्त दिखाव्याचे काम करते. जबाबदारी काहीच घेत नाही. राज्यात १ लाख लोकांना नोकऱ्या दिल्या असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. हा सुद्धा फेक नेरिटिव्ह पसरवण्याचाच प्रकार आहे असे म्हणत अच्छे दिनचे आश्वासन देऊन भाजपाचे फसवणूक केली पण सत्तेत आलो तर सच्चे दिन नक्कीच आणू, असा विश्वास पटोले यांनी व्यक्त केला.

एससी, एसटी, ओबीसी, अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय समन्वयक के. राजू, आणि एस. सी. विभागाचे अध्यक्ष राजेश लिलोटिया यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, एससी, एसटी, ओबीसी, अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय समन्वयक के. राजू, एस.सी. विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश लिलोटिया, अल्पसंख्याक विभागाचे राज्याचे अध्यक्ष आमदार वजाहत मिर्झा, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश सरचिटणीस संघटन व प्रशासन प्रमोद मोरे, प्रतिभा शिंदे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सेल व विभागाच्या प्रमुख प्रज्ञा वाघमारे यांनी केले. यावेळी विविध सेल व विभागाच्या प्रमुखांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विभाग व सेलने लोकसभा निवडणुकीत चांगले काम करून विजयात योगदान दिल्याबद्दल प्रज्ञा वाघमारे यांचाही सत्कार करण्यात आला.

# ड्रोन कॅमेराचा खोडसाळपणा जरांगेच्याच लोकांनी केला : नवनाथ वाघमारे

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा देण्यात यावी, अशी मागणी त्यांच्या समर्थकांनी केली आहे. मनोज जरांगे यांचा मुक्काम सध्या अंतरवाली सराटीच्या सरपंचांच्या घरी आहे. गेल्या काही दिवसांपासून या परिसरातील आकाशात ड्रोन फिरताना दिसून आला आहे. सोमवारी मध्यरात्री एक ड्रोन मनोज जरांगे राहत असलेल्या घराभोवती घिरट्या घालत होता. जरांगे पाटील यांनी स्वतः गच्चीवर जाऊन हा ड्रोन पाहिला होता. आंतरवालीच्या गावकऱ्यांनी याबाबत पोलिसांकडे तक्रार केली असली तरी या घटनेमुळे मराठा आंदोलक काहीसे धास्तावले आहेत. त्यामुळेच मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी पांडुरंग तारख यांनी जरांगे यांना सरकारने झेड प्लस सुरक्षा द्यावी, अशी मागणी केली आहे. मात्र, ओबीसी उपोषणकर्ते नवनाथ वाघमारे यांनी हा ड्रोनचा खोडसाळपणा जरांगेंच्याच लोकांनी केला असेल, असे विधान केले आहे.

ड्रोन कॅमेराचा खोडसाळपणा जरांगेच्याच लोकांनी केला असेल, ड्रोन दिशाभूल करुन पदरात काहीतरी पाडून घेण्याचा प्रोग्राम असू शकतो, अशी प्रतिक्रिया ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी दिली आहे. जरांगेंना भीती वाटत असेल तर त्यांनी संरक्षण घेतलं पाहिजे, आमचा त्याला विरोध नाही असेही वाघमारे यांनी म्हटलं. तसेच, शरद पवार यांनी आरक्षणाबाबत आपली नक्की भूमिका काय आहे, असे जाहीर करण्याचं आवाहनही त्यांनी केलं. कारण, त्यांचे नेते राजेश टोपे सभागृहात सगे सोयरेची अंमलबजावणी करण्याची मागणी करत असल्याने ती त्यांची व्यक्तिगत भूमिका आहे का? असा सवाल वाघमारे यांनी उपस्थित केला आहे.

विशेष म्हणजे मनोज जरांगे यांच्या घराभोवती ड्रोनचा फेरफटका झाल्याच्या मुद्द्यावरुन आज विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातही चर्चा झाली. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत हा मुद्दा मांडला. अंतरवली सराटी गावची ड्रोनच्या माध्यमातून टेहळणी सुरु आहे. त्यामुळे जरांगे पाटलांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. या सगळ्यामागे कोण आहे? अंतरवाली सराटी हे गाव मराठा आरक्षण आंदोलनासाठी ओळखले जाते. त्यामुळे याप्रकरणात आवश्यक असल्यास संपूर्ण चौकशी झाली पाहिजे. गरज भासल्यास मनोज जरांगे यांना संरक्षण द्यावे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले.

राज्याचे गृह राज्यमंत्री शंभुराज देसाई यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या घराबाहेर फिरणाऱ्या ड्रोनबाबत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आल्याचे सांगितले. या संदर्भात चौकशी करुन सविस्तर अहवाल दिला जाईल. जरांगे पाटील यांना याआधी हत्यारी संरक्षण दिले आहे. पोलीस अधिकाऱ्यांसबोत बोलून अधिक संरक्षण देण्याची गरज असल्यास ते दिले जाईल, असे आश्वासनही मंत्री शंभुराज देसाई यांनी सभागृहात उत्तरादाखल बोलताना दिले.

# अवजड वाहनांचा बस स्टॉपला वेढा

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** धुळे सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर पारगाव टोल नाका ते येडशी येडशी टोल नाका या धाराशिव जिल्ह्यातील सोलापूर धुळे हद्दीतील महामार्गावर खाजगी कंपन्यांचे अवजड मोठी वाहने सरासपणे पंधरा पंधरा दिवस एकाच जागी उभा असतात. ही वाहने रस्त्याच्या कडेला वरदळीच्या ठिकाणी तसेच महामार्गावर एसटी बस थांबा असलेल्या ठिकाणी जाणीवपूर्वक उभे केल्याने एसटी बस चालकाला एसटी बस एसटी बस थांब्यावर आणण्यास अडथळा होत आहे. त्यामुळे त्यांना चक्क महामार्गावर बस उभी करावी लागत आहे. महामार्गावरून भरधाव वेगाने वाहणारी वाहने आणि महामार्गावरच एसटी बस मधून चढ उतार करणाऱ्या प्रवाशांची अपघाताची शक्यता न करता येत नाही. सध्या आषाढी एकादशी मुळे मराठवाड्यातून पंढरपूरकडे ये जा करणारे वारकरी संप्रदाय भरपूर आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक तसेच महिला बसमधून येजा करतात. आणि अश्यातच महामार्गावरील बस थांब्यावर अवजड वाहने उभी करून या वाहना वरील चालक एकत्र बसून मद्य प्राशन करणे, जुगार खेळणे बस स्थानकावरील बाकड्यावर मांसाहार शिजवणे या मूळे वारकरी संप्रदाय प्रवाशी तसेच महिला प्रवाश्यामध्ये भीती चे वातावरण निर्माण झाले आहे महामार्ग वाहतूक पोलीस आणि संबंधित ठेकेदारांचं कोणतंही नियोजन नसल्यामुळे ही समस्या रोजच वाढत चालली आहे.


केसरी

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीची कोंडी

पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष : वाहन चालकांचे भर रस्त्यावर मद्यप्राशन

# कांदा, दूधप्रश्नावर खा. नीलेश लंके यांचे शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावरआंदोलन

आधुनिक केसरी न्यूज


**नगर :** निर्यातबंदीमुळे कांद्याचे कोसळलेले भाव तसेच दुधाच्या दरात झालेल्या कपातीच्या निषेधार्थ खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी शेतकरी जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे. शुक्रवार दि.५ जुलै रोजी सकाळी १० वाजता या आंदोलनास सुरूवात होणार असून या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे. या आंदोलनासंदर्भात खा. लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना निवेदन सादर केले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, राज्यातील कांदा व दुध उत्पादक शेतकरी योग्य भाव न मिळाल्यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. दुधाचे भाव गेली वर्षभर सातत्याने कोसळत आहेत. सध्या दुधाला मिळणाऱ्या भावामध्ये दुध उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही त्यातून निघत नसल्याने राज्यातील शेतकरी मेताकुटीला आलेला आहे. सरकारने दुधाला अनुदान देण्याची घोषणा केली खरी परंतू अनुदानाच्या जाचक अटी व शर्तींमुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ होत नाही. नुकतीच केंद्र सरकारने दहा हजार टन दुध पावडर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे.



विशेष म्हणजे ही आयात करमुक्त असल्यामुळे दुध उत्पादकांना त्याचा मोठा फटका बसणार आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, केंद व राज्य सरकारच्या धोरणांमुळे शेती तोटयात जाऊ लागली आहे. वाढलेली महागाई, नैसर्गिक आपत्ती, खतांचे वाढलेले दर, सरकारचे शेतीमालासंदर्भातील चुकीचे धोरण, रासायनिक खते, बी-बियाणे, किटकनाशके, शेती औजारे यांच्या माध्यमातून जी. एस.टी. चा शेतकऱ्यांवर बोजा पडलेला आहे. मात्र देशभरातील जनतेला अन्नधान्य पुरविणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर सरकारला दिसत नाही. यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी सरकारने संपूर्ण कर्जमाफीसह तात्काळ विविध उपाययोजना करणे आवष्यक आहे. राज्यातील शेतकऱ्यांमध्ये दुध आणि शेतीमालाच्या हमी भावावरूनप प्रचंड असंतोष आहे. यासाठी अनेक शेतकरी संघटना विविध आंदोलने करीत आहेत. शेतकऱ्यांच्या दुधाला ४० रूपये दर मिळावा, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, कांदा व इतर शेतीमालाला योग्य हमीभाव मिळावा या मागणीसाठी हजारो शेतकरी, दुध उत्पादक तसेच विविध शेतकरी संघटनांसह ५ जुलै रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे खा. लंके यांच्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षपदी राजेंद्र झरेकर

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाच्या अहमदनगर जिल्हा उपाध्यक्षपदी राजेंद्र पोपटराव झरेकर यांची निवड झाली. अहमदनगर येथील राष्ट्रवादी भवन मध्ये पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके पाटील यांनी राजेंद्र झरेकर यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा समन्वयक प्रा. सिताराम काकडे, सांस्कृतिक आघाडीचे जिल्हा कार्याध्यक्ष भगवान राऊत, पाथर्डी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजीत ससाने, राष्ट्रवादी काँग्रेसचे शेवगाव तालुका उपाध्यक्ष सुभाष लांडे पाटील, प्रतापराव बडदे, बाळासाहेब काशीद, प्रशांत भराट, सचिन शेळके, चंद्रकांत वाघमारे, धनंजय लांडगे उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार यांचे पुरोगामी विचार व पक्षाची ध्येय, धोरणे समाजात रुजवून पक्ष संघटना मजबूत करावी तसेच प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील, कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनानुसार जनतेच्या विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहावे. आपल्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनुभवाचा व उद्योग क्षेत्रातील कौशल्याचा उपयोग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढविण्यासाठी निश्चित होईल, असा विश्वास व्यक्त करीत जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके पाटील यांनी झरेकर यांचे अभिनंदन करीत भविष्यकालीन वाटचालीस शुभेच्छा दिल्या.जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके पाटील यांनी मला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उपाध्यक्षपदी निवड करून सामाजिक काम करण्याची संधी दिली. या संधीचा उपयोग मी पक्ष संघटना वाढीसाठी तसेच सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी निश्चित करील, असा विश्वास राजेंद्र झरेकर यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी प्रा. सिताराम काकडे व शिवशंकर राजळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. राजेंद्र झरेकर यांच्या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव अॅड. प्रतापराव ढाकणे, पाथर्डी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, शेवगाव तालुका अध्यक्ष हरिष भारदे, कार्याध्यक्ष माधव काटे, शहराध्यक्ष बाळासाहेब डाके, वजीर पठाण, एजाज काझी, सुभाष लांडे, बाळासाहेब काशीद, प्रशांत भराट, विजय शिंदे, सचिन शेळके, चंद्रकांत गायकवाड यांनी अभिनंदन केले.




# संविधानातील मानवी मूल्यांचा जागर करण्यासाठी बार्टीची संविधान दिंडी : सुनील वारे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** संतांनी मानवतेची शिकवण दिली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर वारकरी संप्रदायाचा मोठा प्रभाव होता. त्यांनी मूकनायक या वृत्तपत्रात संत तुकारामाचे अभंग प्रसिद्ध केले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानामध्ये देशातील जनतेला स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय, मूलभूत अधिकार आणि कर्तव्य बहाल केली. राष्ट्राची एकता आणि एकात्मता जपण्यासाठी समता महत्त्वाची असून संविधान दैनंदिन आचरणात आणणारा ग्रंथ आहे.संविधान दिंडीच्या माध्यमातून बार्टी संताचे समतेचे विचार आणि संविधानातील मानवी मूल्यांचा जागर करण्यासाठी बार्टीची संविधान दिंडी पालखी सोहळ्यात असल्याचे मत बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांनी व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने संत तुकाराम महाराज संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात आंळदी ते पंढरपूर पर्यंत संविधान दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच वारकरी बांधवाना सुनिल वारे यांच्या हस्ते संविधान प्रत भेट देऊन सन्मानित करण्यात आले.नाना पेठ, पुणे येथे दिनांक १ जुलै २०२४ रोजी संविधान जनजागृती कार्यक्रमात शाहिर बापु पवार यांनी"जगात भारी माझ्या भिमाचं संविधान " हा संविधान जनजागृती सांस्कृतिक, प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करून नागरिकांना संविधानाने दिलेले अधिकार व कर्तव्ये या विषयी प्रबोधन केले.संविधान उद्देशिकेचे सामुहिकपणे वाचन प्रकल्प अधिकारी सुनंदा गायकवाड यांनी केले.ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अंकल सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते सचिन सोनताटे,ह.भ.प दयाराम पानझाडे, रमेश मंडोलकर, प्रकल्प व्यवस्थापक नसरिन तांबोळी, प्रकल्प अधिकारी जागृती गायकवाड,उषा भिंगारे, राहुल कवडे,समतादुत यांच्यासह वारकरी बांधव, नागरिक विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रकल्प अधिकारी युनुस तडवी यांनी केले. आभार रामदास लोखंडे यांनी मानले.



# शैक्षणिक क्षेत्रात महापुरुषांचे कार्य उल्लेखनीय : राजश्री जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुलआबेद्दीन**

**मेहकर :** तालुक्यातील 3 जुलै 1851 ला महात्मा फुले यांनी बहू जनांसाठी पहीली शाळा सुरू केली व लोणीगवळी येथे सन 1969 मधे स्वर्गीय रावसाहेब श्रीपतराव पाटील यांनी शिवाजी शिक्षण संस्था उभारुन बहुजनांना शिक्षणाची द्वारे उघडी केली तर स्वर्गीय रामचंद्र पाटील यांनी 1973 मध्ये इमारत बांधून दिली अशा महापुरुषांचे विचार प्रत्येकाने अंगिकारावे असे उदगार केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या सुविध पत्नी सौ. राजश्री ताई जाधव यांनी लोणीगवळी येथे प्रतिमा अनावरण व मोफत गणवेश वाटप प्रसंगी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भास्करराव पाटील होते तर प्रमुख अतिथी म्हणून सौ. राजश्री ताई जाधव होत्या यावेळी संस्थेचे संचालक संपतराव देशमुख जिवनराव पाटील प्रविण पाटील मदन राव पाटील प्रशांत पाटील सतिष पाटील उमेश पाटील रणजित पाटील देवानंद पाटील विनोद पाटील नरसिग पाटील सौ. वर्षोताई पाटील गजानन पाटील मनेष पाटील राजकुमार जाधव जयदेव पदमने आनंदराव भालेराव देविदास कष्टे मिराताई पाटील राणीताई घोडे किशोर राऊत संदीप पाटील सखाराम काळदाते जनार्दन तोंडे आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी सर्व प्रथम शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय रावसाहेब श्रीपतराव पाटील व रामचंद्र पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवर यांचे हस्ते करुन प्रतिमा अनावरण करण्यात आले. यावेळी दे. भ.श्री हि. सो. उर्फ बाबुराव पाटील विद्यालय लोणीगवळी चे प्राचार्य सुरेश हिवरकर व शिक्षक कर्मचारी यांनी मान्यवरांचे पुष गुच्छ देऊन सत्कार केला व त्यांनंतर वर्ग 5 च्या विद्यार्थ्यांना संस्था व शिक्षक कर्मचारी यांचे वतीने स्वखर्चाने मोफत गणवेश वाटप करण्यात आले. यावेळी प्रशांत पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्येक्रमाचे संचालन विवेक नागरीक तर आभार प्रदर्शन प्राचार्य सुरेश हिवरकर यांनी केले या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक व पालक उपस्थित होते.



# डिझायनिंग, आर्किटेक्चर, फॅशन टेक्नॉलॉजीमध्ये करिअरच्या अमाप संधी : अनंत देशपांडे

## 'त्रिमिती'च्या सेमिनारला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रमांत अडकून न पडता डिझायनिंग, आर्किटेक्चर, फॅशन टेक्नॉलॉजीसारख्या चाकोरीबाहेरील क्षेत्रात करिअरची संधी देणारे अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मात्र, माहितीअभावी तुरळक विद्यार्थीच यात प्रवेश घेतात. या क्षेत्रात नोकरीसह स्वयंरोजगारालाही वाव आहे. याच्या प्रवेश परीक्षा देशपातळीवर होत असल्याने कठोर मेहनतीची आवश्यकता आहे. सूक्ष्म नियोजनातून या परीक्षात यश मिळवणे शक्य असल्याचे मत इन्स्टिट्यूट ऑफ इंटेरिअर डिझाईन अँड फॅशन डिझाईनचे (इफमा) संस्थापक अनंत देशपांडे यांनी व्यक्त केले.

बारावीनंतर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझायनिंग (एनआयडी), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी), कॉमन एंट्रेन्स एक्झामिनेशन फॉर डिझाईन (सीड), अंडरग्रॅज्युएट कॉमन एंट्रेन्स एक्झामिनेशन फॉर डिझाईन (यूसीड), नॅशनल एप्टीट्युड टेस्ट इन आर्किटेक्चर (नाटा) तसेच अभियांत्रिकी



प्रवेशासाठी असणारी जॉईंट एंट्रेन्स एक्झामिनेशन (जेईई पेपर २) सारख्या परीक्षांना बसता येते. या परीक्षांविषयाची माहिती देण्यासाठी 'त्रिमिती- दि इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन' संस्थेतर्फे डिझायनिंग आणि आर्किटेक्चरमधील करिअर या विषयावर रविवारी (३० जून) सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

**विद्यार्थ्यांसह पालकांचा सहभाग :** उस्मानपुऱ्यातील आयसीडी, श्रीनिधी हॉल येथे झालेल्या सेमिनारला ७५ विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती. 'त्रिमिती- दि इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन'च्या संचालिका शर्वरी पातूरकर, गौरी नरसापूर आणि दिव्या कुलकर्णी यांनी पावर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे हे शिक्षण देणाऱ्या संस्था, प्रवेश परीक्षा आणि करिअरच्या संधींबाबत माहिती दिली. आयसीडीचे संचालक प्रफुल्ल मिरजगावकर म्हणाले, पालकांनी आपल्या मुलांचे करिअर मेडिकल वा इंजिनिअरिंगपुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या आवडीचा विचार करूनच कोर्सेसची निवड करावी. फॅशन डिझायनिंग हे त्यापैकीच एक क्षेत्र असल्याचे नमूद केले.

**डिझायनिंगला जगभरात मागणी :** अनंत देशपांडे म्हणाले, जगभरात डिझायनिंगच्या क्षेत्राला मागणी वाढत आहे. डिझायनिंग ही एक कला आहे. कल्पकता असणाऱ्या विद्यार्थ्यांना यात भरपूर संधी आहेत. प्रामुख्याने प्रॉडक्ट डिझायनिंग, फॅशन डिझायनिंग, कम्युनिकेशन डिझायनिंग इ. विषयात स्पेशलायझेशन करता येते. तर अनिमेशन, व्हीएफएक्स, वेब डिझाइन, इंटेरिअर डिझाइन, ग्राफिक्स यासारख्या करिअरच्या मोठ्या संधी आहेत. स्वतःचा स्टुडिओ अथवा नोकरीची संधी उपलब्ध आहे. त्यांनी दैनंदिन जीवनात डिझायनिंगचे महत्त्व, संवाद कौशल्य, करिअर, पॅकेजेस, व्यवसायाची उभारणी, रंगांचे मानसशास्त्र आणि स्वतःमधील कल्पकता ओळखण्याचे कौशल्य उदाहरणासह विषद केली. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरातून शंकांचे समाधान करून घेतले.

**तीन मैत्रिणींचे स्टार्टअप 'त्रिमिती' :** सिडको एन-१ येथील भक्ती गणेश मंदिराजवळ 'त्रिमिती- दि इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन' संस्था सुरू करण्यात आली असून शहरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी यानिमित्ताने उपलब्ध करवून देण्यात आली आहे. 'त्रिमिती-दि इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन' हे स्टार्टअप तीन मैत्रिणींनी सुरू केले आहे. शर्वरी पातूरकर यांनी अर्बन डिझाईनमध्ये मास्टर ऑफ आर्किटेक्चर केले आहे. गौरी नरसापूर यांनी मास्टर ऑफ फाईन आर्ट्स इन पेंटिंगची पदवी घेतली आहे. तर दिव्या कुलकर्णी यांनी मास्टर ऑफ डिझाईन इन फॅशन टेक्नॉलॉजी-टेक्सटाईल डिझाईनचे शिक्षण घेतले आहे. तिघींना अध्यापन क्षेत्रातील पाच वर्षांचा अनुभव आहे.

# निरेत ॲसेंडच्या विद्यार्थ्यांकडून पालखी दिंडी सोहळा

## विद्यार्थी बनले वारकरी, ज्ञानोबा माऊलीचा गजर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** श्री.संत ज्ञानेश्वर महाराज पालखीच्या अनुषंगाने निरा ता.पुरंदर येथे ॲसेंड इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने विठू नामाचा व ज्ञानोबा माऊलीचा व तुकोबांचा जयघोष करत पालखी दिंडी सोहळा संपन्न करण्यात आला.यावेळी पालखी मिरवणूक सोहळा आणि वारकऱ्याच्या वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांमुळे वातावरण हे अगदी वारीमय आणि भक्तिमय झाले होते.दिंडी निघण्यापूर्वी विठ्ठल रूक्मिणीच्या मुर्तीचे तसेच श्री.संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून निरा शिवतक्रारचे उपसरपंच राजेश काकडे आणि सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे उपस्थित होते.याप्रसंगी दोघांनी मनोगत व्यक्त करत या दिंडी सोहळ्याचे विशेष कौतुक केले.सचिन मोरे यांनी "जाता पंढरीशी" हा अभंग गात दिंडी सोहळ्यात भक्तीमय वातावरण निर्मिती केली. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे, सचिव नीता खोमणे, प्राचार्या सुषमा भुंजे, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषीदिनाचे औचित्य साधून प्रमुख पाहुण्यांचा सत्कार हा झाडाचे रोपटे देऊन करण्यात आला. यातून "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांमार्फत विठ्ठल रुक्मिणीची वेशभूषा हुबेहूब अशी साकारण्यात आली होती. तसेच निवृत्ती, ज्ञानेश्वर, मुक्ताई, सोपान




आदी वेशभूषा विद्यार्थ्यांनी साकार केली होती. हातातील टाळ, डोक्यावर घातलेली पांढरी टोपी व वारकरी संप्रदायाचा भगवा ध्वज घेऊन चालणारी वारकरी मुले मुली,डोईवर तुळशी वृंदावन घेऊन विद्यार्थी विठठल नामाचा गजर करत पालखी सोहळ्यात सहभागी झाली होती. भजन,अभंग म्हणत तसेच फुगडी खेळत वैष्णवांचा मेळावा हा विठ्ठल मंदिराकडे जात असताना अनेकांनी शाळेतील विद्यार्थ्यांचे हे रूप स्वतःच्या मोबाईल मध्ये कैद केले.आपली भारतीय संस्कृती जपली जात आहे.

याबद्दल ही मान्यवरांनी विशेष लक्ष केंद्रीत केले. निरा शहरातून शाळेने पालखी सोहळ्याचे दर्शन घडवून आणल्याबद्दल निरेसह पंचक्रोशीतील लोकांकडून शाळेचे विशेष कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांनी हातात घेतलेले पोस्टर हे सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले.पोस्टर वर सामाजिक संदेश देणारे विचार लिहिण्यात आले होते. हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी सुरेखा पाटोळे, रुपाली शितोळे, पुष्पा शिंदे, अल्पना फरांदे, दीपिका निगडे, माधुरी ठोंबरे, मनिषा धायगुडे, जास्मिन बागवान,श्वेता शिळीमकर, किशोरी थोपटे, शुभांगी माने,कोमल रणवरे आदी शिक्षिका तसेच कर्मचारी वर्ग पुष्पा गायकवाड आणि रुपाली थोपटे,रेखा मूल्या आणि विद्यार्थी वर्ग आदींनी विशेष मेहनत घेतली. सुत्रसंचालन जास्मिन बागवान यांनी केले.तसेच आभार प्रदर्शन रुपाली शितोळे यांनी मानले. विठ्ठल मंदिरात माधुरी ठोंबरे या शिक्षिकेने अभंगाचे विशेष सादरीकरण केले.

# श्वानाच्या हल्ल्यात महिला जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बचत गटाच्या थकीत पैशाची मागणी



करण्यासाठी गेलेल्या महिलेच्या अंगावर पाळीव श्वान सोडण्यात आल्याची घटना येरवडा भागात घडली. श्वानाच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी एका महिलेसह दोघांविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका ४० वर्षीय महिलेने येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या माहितीनुसार, ज्योती रघुनाथ शिर्के (वय ४२) आणि तिचा पुतण्या मिहीर शिर्के (वय २५, दोघे रा. गांधीनगर येरवडा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला बचत गटातील थकीत रक्कम मागणी करण्यासाठी आरोपी ज्योती शिर्के हिच्या घरी रविवारी (३० जून) सकाळी पावणेनऊच्या सुमारास गेली होती. थकीत पैसे मागितल्याने शिर्के आणि तिचा पुतण्या मिहीर यांनी महिलेला शिवीगाळ, तसेच दमदाटी केली. आरोपींनी त्यांच्या घरातील पाळीव श्वान महिलेच्या अंगावर सोडले. श्वानाने महिलेच्या उजव्या हाताचा तीन ते चार वेळा चावा घेतला. श्वानाच्या चाव्यामुळे हात रक्तबंबाळ झाला. महिलेने आरोपी शिर्के यांच्याकडे मदतीसाठी विनंती केली. तेव्हा आरोपींनी महिलेला मदत न करता घराचा दरवाजा आतून बंद केला. पाळीव श्वानाच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. येरवडा पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.

# पिके वाचवण्यासाठी चक्क टँकरने पाणीपुरवठा; भंडाऱ्यातील शेतकऱ्याची धडपड

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** मृग नक्षत्र कोरडा गेला, जुलै महिन्याला सुरवात झाली असून अजूनही जिल्ह्याला चांगल्या पावसाची प्रतीक्षा आहे. त्यातच काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांनी धान पिकांसह इतर पिकांची पेरणी केली आहे. पेरणी केलेली पिकेही उगवली आहेत. मात्र पावसाअभावी उगवलेले पऱ्हे सुकण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत पावसाअभावी सुकलेली धानाची नर्सरी वाचविण्यासाठी लाखांदूर तालुक्यातील एका शेतकऱ्यावर चक्क टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. जिल्ह्यासह लाखांदूर तालुक्यात अद्यापही चांगला पाऊस पडला नाही. शेतकऱ्यांनी धान्याच्या नर्सरी लावल्या मात्र बियाणांची उगवणी होताच पावसाचा खंड पडल्याने अनेक ठिकाणी धान नर्सरी उष्णतेमुळे करपू लागल्या आहेत. धानाच्या नर्सरी वाचविण्यासाठी आता शेतकऱ्यांनी टँकरद्वारे पाणी देणे सुरू केले आहे. लाखांदूर तालुक्यात प्रथमच टँकरने पाणी पुरवठा करण्याची वेळ आल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे. लाखांदूर तालुक्यातील विविध भागात खरिपाच्या काळात चौरस परिसरातील गोसे खुर्द धरणाच्या डाव्या कालव्यातून इटिया डोह धरण व कृषी विद्युत पंपासह सिंचनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. तर पावसाच्या पाण्याने किमान क्षेत्र सिंचनाखाली येते. मात्र, गेल्या काही दिवसांत



सिंचनाची सोय असलेल्या क्षेत्रासह तालुक्याच्या बिगर सिंचनाखालील एकूण १८३३ हेक्टर क्षेत्रात भात रोपवाटिकेची पेरणी झाल्याची माहिती आहे. मात्र, पावसा अभावी नर्सरी उद्ध्वस्त होण्याची शक्यता आहे. बहुतांश शेतकऱ्यांकडून विविध सुविधांद्वारे सिंचन केले जात आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून बिगर बागायती भागातील धान नर्सरी पावसाअभावी सुकू लागल्या आहेत. ही धान नर्सरी वाचवण्यासाठी लाखांदूर येथील एका शेतकऱ्याने टँकरने पाणीपुरवठा केला आहे.नेहमीप्रमाणे पावसाळा लागताच शेतकरी शेतीच्या कामाला लागतो. जिल्ह्यातही शेतकऱ्यानी पेरणी केली. जून महिन्यात जिल्ह्यात पावसाने अधेमध्ये हजेरी लावली. या पावसात शेतकरी धानाचे पऱ्हे टाकले. मात्र आता जुलै महीना लागला असुन पावसाने हुलकावणी दिली आहे. यामुळे जमिनीतून निघत असलेले पिकांचे कोंब आता कोमेजू लागले आहेत. त्यांना पाण्याची नितांत आवश्यकता आहे. येत्या दोन दिवसात दमदार पाऊस न पडल्यास शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावेल.

यंदा खरीप हंगामात लाखांदूर तालुक्यात एकूण १.०१८ हेक्टर क्षेत्रात विविध पिकांची पेरणी झाली आहे. या पेरणीअंतर्गत एकूण ३३४ हेक्टर बिगर सिंचन क्षेत्रात भाताची पेरणी झाली आहे. तर उर्वरित क्षेत्रात तूर पिकासह तीळ, सोयाबीन व भाजीपाला पिकांची ५६८ हेक्टरवर लागवड करण्यात आली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात पुरेशा पावसाअभावी बिगर बागायती भागात पेरणी केलेली पिके सुकू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. मात्र, येत्या काही दिवसांत पाऊस न पडल्यास बहुतांश पिके उद्ध्वस्त होण्याची शक्यता आहे.

# जागतिक प्लॅस्टिक मुक्ती दिन स्टेटस ठेवण्यापुरता नको

## उदासीन प्रशासन : सर्रासपणे प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्या सर्वांसाठी जनजागृतीची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** 3 जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन' म्हणुन साजरा केला जातो. या दिवशी प्लास्टिक प्रदूषणाच्या गंभीर समस्यांबद्दल आणि जमिन,नदी,नाले,ओढे यापासून ते सागरी जीवापर्यंत प्लास्टिक पिशव्याने पर्यावरणाला घातलेला विळखा व त्यामुळे पृथ्वीला होणारा गंभीर धोका याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी 'प्लास्टिक प्रदूषणावर उपाय' यासाठी हा दिवस साजरा होत असतो. या वर्षी 2024 मध्ये या जागतिक पर्यावरण दिनाचे 51 वे वर्ष आहे. प्लास्टिक हे पर्यावरण जगासाठी अत्यंत धोकादायक आहे. प्लास्टिकच्या पिशव्या कुजण्यासाठी शेकडो वर्षे लागतात जे पर्यावरणासाठी खूपच गंभीर समस्या निर्माण करत आहे.प्लास्टिक प्रदुषणामुळे उद्‌भावणाऱ्या समस्या आणि पर्यावरणाच्या सुरक्षेसाठी महत्वाच्या मुद्द्यांवर लोकांना जागरुक करण्यासाठी जगभरात मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम आयोजित केले जातात. जगात बऱ्याच देशांनी प्लास्टिक वापरावर बंदी केली आहे. महाराष्ट्र मध्ये २०१८ साली प्लास्टिक बंदीचा कायदा संमत करण्यात आला. २३ मार्च २०१८ रोजी,महाराष्ट्र सरकारने एकदाच वापरात येणाऱ्या प्लास्टिक पिशव्या तसेच चमचे,प्लेट्स,बाटल्या



आणि थर्माकोल यासारख्या सर्व प्लास्टिक युक्त सामग्रीचे उत्पादन, वापर, विक्री, वितरण आणि साठवण यावर बंदी घातली खरी पण सहा वर्षांमध्ये प्रशासनाकडून जनजागृतीचा अभाव, कुठेही कठोर शिक्षा किंवा दंडात्मक कारवाई नाही.

यामुळे महाराष्ट्राभर शहरापासुन ते खेड्यापर्यंत कुठेही खुलेआम प्लास्टिक पिशव्या वापरल्याचे निदर्शनास येत आहे. हि समाज निसर्ग जीव सृष्टीसाठी खूपच चिंतेची बाब आहे. भाजीपाला, बाजारपेठा, छोटे-मोठे कापड दुकानदार, मांस विक्री करणारे, फळ वाले, फेरीवाले, कृषी दुकानदार ल,पान टपरी वाले प्रामुख्याने यांच्याकडून सर्वात जास्त ग्राहकाला प्लास्टिक पिशवी दिली जात आहे. सर्वसामान्य माणूसही घराबाहेर पडताना कधीच कापडी पिशवी घेऊन बाहेर पडत नाही.

तो ही दुकानदाराकडे प्लास्टिक पिशवी साठी गळ घालतो. जगभरात दर वर्षी 430 दशलक्ष टनांहून अधिक प्लास्टिक तयार केले जाते, त्यापैकी निम्मे प्लास्टिक फक्त एकदाच वापरण्यासाठी डिझाइन केले जाते. त्यातील 10 टक्क्यांपेक्षा कमी प्लास्टिकचा पुनर्वापर केला जातो. अंदाजे 19-23 दशलक्ष टन दर वर्षी तलाव, नद्या आणि महासागरांमध्ये मिसळते. मायक्रोप्लास्टिक्स 5 मिमी व्यासापर्यंतचे छोटे प्लास्टिकचे कण अन्न, पाणी आणि हवेत मिसळतात. यामुळें पृथ्वीग्रहावरील प्रत्येक व्यक्ती वर्षाला 50 हजारांपेक्षा जास्त प्लास्टिकचे कण श्वासाद्वारे ग्रहण करीत असल्याचा अंदाज आहे.फेकून दिलेले किंवा जाळलेले एकदा वापरलेले प्लास्टिक मानवी आरोग्य आणि जैवविविधतेला हानी पोहोचवते आणि पर्वताच्या शिखरापासून समुद्राच्या तळापर्यंत प्रत्येक परिसंस्थेला प्रदूषित करते.

याबाबत सामाजिक संस्था प्रशासन शाळा महाविद्यालय यांनी पुढाकार घेऊन विविध कार्यक्रमातून तसेच रॅली मधून जनजागृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण मुंबई महानगरांसह पुणे अन्य शहरे यांच्याकडून गोळा केलेला कचरा आणि त्यातील प्लास्टिक ढीग पाहता अंगावर थरकाप येतो आहेत. त्यामुळे दिवा फडफडत असला तरी अजून तो पूर्णपणे विझलेला नाही. आधीचे असे सहा दिवे मात्र विझलेत.

कारण पृथ्वीच्या आरोग्याच्या ठळक नऊपैकी सहा चाचण्यांचा रिपोर्ट अतिशय चिंताजनक आहे.याला शास्त्रीय भाषेमध्ये याला प्लॅनेटरी बाउंड्रीज म्हणतात.हवामानबदल, बायोस्फिअर इंटेग्रिटी (यात जैवविविधता आलीच), प्लास्टिक कॅरीबॅग, कारखान्यातील नदीत सोडलेले केमिकल रसायने त्यामुळे यामुळे शुद्ध पेयजल उपलब्धता कमी होणे,जमिनी साठी अति प्रमाणात रासायनिक खते वापर व पोषण द्रव्यांमधील प्रदूषण तसेच मातेच्या दुधातून अपत्याच्या शरीरात प्रवेश करणारे मायक्रोप्लॅस्टिक तसेच किरणोत्सर्गी कचरा या मानवनिर्मित संकटांनी धोक्याची पातळी कधीच ओलांडली आहे. नऊपैकी सहा चाचण्यांचे निष्कर्ष चिंताजनक असणे म्हणजे रुग्ण व्हेंटिलेटरवरच आहे. दिलासा इतकाच, आपल्या या धरणी आई च्या म्हणजे वसुंधरेच्या आरोग्याची तीन लक्षणे आज घडीला थोडी फार ठीकआहेत. वायुप्रदूषण, ओसियन ॲसिडिफिकेशन व ओझोन डिप्लेशन या तीन चाचण्यांची स्थिती सध्या अगदीच चिंताजनक नसली तरी कायम ठीक राहण्या सारख्याही नाही.मानवाच्या पुढील पिढीचे स्वास्थ टिकवण्यासाठी व निसर्ग साखळीतील जीव वाचवण्यासाठी प्लास्टिक वापर थांबलाच गेला पाहिजे. असं तज्ञ व जाणकार लोकांचे मत आहे.

# कापूस प्रश्नावरून विधानसभा विरोधी पक्षनेते वडेट्टीवारांनी सरकारला धरले धारेवर

## कापसाला दीडपट हमीभाव देण्याबाबत खुलासा करावा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शासनाने हमीभावाने कापूस खरेदी केला नाही. महाराष्ट्रातील एकूण किती कापूस उत्पादक आहेत, पणन महामंडळाने किती कापूस खरेदी केला आहे. किती कापूस खाजगी व्यापाऱ्यांनी खरेदी केला आहे. किती कापूस CCI ने खरेदी केला आहे. खाजगी व्यापाऱ्यांनी कमी दर दिला असतांना अशा व्यापाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली आहे? असा सवाल उपस्थित करत स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे सी-2 वर आधारित हमीभाव द्यावा अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधासभेत केली आहे. विधानसभेत प्रश्नोत्तराच्या चर्चेदरम्यान श्री. वडेट्टीवार बोलत होते.

वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात भारतीय कपास निगम (सीसीआय) ची पुरेशी केंद्र नव्हती. देशात कापूस आयात केल्यामुळे व्यापाऱ्यांनी कापूस विकत घेतला नाही. त्यामुळे त्यात शेतकरी पिचला गेला. खाजगी व्यापाऱ्यांनी त्याचा फायदा घेतला. अनेकांच्या घरात कापूस पडून होता. सीसीआयच्या दराप्रमाणे खरेदी होत नाही. अवैधरित्या बियाणांचा काळा बाजार सुरु आहे. भरारी पथकांकडून कारवाई करूनसुद्धा अवैध कापूस बियाणे राजरोसपणे राज्यात येतात. हमी भावाबाबत केंद्र सरकारकडे बोट दाखवून दुर्लक्ष करू नका, असे ठणकावून सांगत मोदी सरकारनं उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव देण्याचा दावा केला होता यासंदर्भातील खुलासा करण्यात यावा, अशी मागणी श्री. वडेट्टीवार यांनी केली.

कापसाच्या मुद्द्यावर सरकारला घेरत वडेट्टीवार म्हणाले की, शासनाने हमीभाव देऊनही हमीभावाने पूर्ण कापूस खरेदी केला नाही. एकूण कापूस उत्पादक शेतकरी किती आहेत ? पणन महामंडळाने किती कापूस खरेदी केला? खाजगी व्यापाऱ्याने किती कापूस खरेदी केला? असे सवाल त्यांनी सरकारला केले. सीसीआयने किती कापूस खरेदी केला आणि केंद्राकडे राज्य सरकारने स्वामिनाथन अहवालाप्रमाणे सी २ प्रमाणे हमीभाव द्यावा, अशी मागणी वडेट्टीवार यांनी सभागृहात केली.



# आशा शिंदे यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये जाहीर प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील इंदिरानगर येथे काल रविवार दिनांक 30 जून रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ .आशाताई श्यामसुंदर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत जनसंवाद बैठक संपन्न झाली. यावेळी आशाताई शिंदे यांच्या हस्ते महादेवाची सर्वप्रथम पूजा करण्यात आली.

यावेळी उपस्थित वडार समाज बांधवांच्या वतीने आशाताई शिंदे यांचा पुष्पहार, शाल ,श्रीफळ व फटाके फोडून भव्य सत्कार करण्यात आला, यावेळी इंदिरानगर लोहा येथील शेकडो कार्यकर्ते, महिला भगिनींनी आशाताई शिंदे यांच्या उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला, यावेळी उपस्थितीत इंदिरानगर येथील कार्यकर्त्यांना संबोधित करताना आशाताई शिंदे म्हणाल्या की,इंदिरानगर येथील महादेव मंदिर, सभा मंडप, या भागातील रस्ते, नाली, पिण्याचे स्वच्छ पाणी, वीज, घरकुल व इतर मूलभूत अनेक समस्या लवकरात लवकर लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय, कर्तव्यक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून सोडवल्या जातील व इंदिरानगर च्या सर्वांगीण मूलभूत विकासासाठी आमदार शामसुंदर शिंदे सदैव कटिबद्ध असल्याचे यावेळी आशाताई शिंदे यांनी यावेळी इंदिरानगर येथील जनसंवाद बैठकीत बोलताना सांगितले, यावेळी पारडी चे माजी सरपंच दिगंबर पाटील डिकळे, लोहा तालुका समन्वय समिती सदस्य सिद्ध पाटील वडजे, खरेदी विक्री संघाचे संचालक सुधाकर पाटील सातपुते, शेतकरी कामगार पक्षाचे लोहा तालुका अध्यक्ष नागेश पाटील हिलाल, संजय गांधी निराधार योजना समितीचे लोहा तालुका सदस्य अशोक सोनकांबळे, वडार समाजाचे लोहा तालुका अध्यक्ष ईरबाजी पवार, माजी नगरसेवक रावसाहेब मंजलवाड, बालाजी डीकळे, सरपंच संदीप पाटील पौळ, विशाल पाटील कौशल्य, प्रणव वाले, अशोक बोधगिरे, सटवाजी डिकळे, किशन मंजलवाड, दुलबा दिंडे, पिराजी पवार, शंकर लिंबोळे, हनुमंत पवार, किशन मंजलवाड, व्यंकटी मंजलवाड, बालाजीराव डिकळे, संदीप डिकळे, जितेंद्र मंदावाड सह महिला भगिनी , व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन निराधार मुलांना एक हात मदतीचा

## विविध स्तरातून अडीच लाख रुपयांची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाईचे राहुल बापुसाहेब पुंडे वय 38 वर्षे यांचे दि.१९रोजी निधन झाले. आईचे निधन ३० वर्षा पूर्वी, तर पत्नीचे निधन ४ वर्षा पूर्वी झालेले. वडील वयस्कर वय ७७ वर्ष घरातील कर्ता पुरुष गेला. राहुलची २ मुले, मुलगी स्वरा वय ७ वर्ष तर मुलगा अर्णव वय ५ वर्ष दोन्ही मुले निराधार झाली. आपण या मुलानं साठी काही तरी केलं पाहिजे असा विचार संकट मोचक, समाज सेवक शहाजीराजे दळवी व आदर्श माजी सैनिक महाराष्ट्र पोलीस भरत आबाजी पुंडे यांच्या मनात आला. सविस्तर चर्चा करून " एक हाथ मदतीचा" हे आव्हान सोशल मीडियाद्वारे सर्व व्हाट्सअप ग्रूपवर करण्यात आले. देहूरोड पोलीस स्टेशन ग्रुप वरती सदरचे मदतीचे आवाहन भरत पुंडे यांनी केले. सदर आव्हानाला देहूरोड पोलीस स्टेशन तसेच इतर पोलीस घटकातील अधिकारी, अंमलदार यांनी मोलाचे योगदान केले ७१ हजार रुपये रोख रक्कम या माध्यमातून जमा झाली कान्हूर मेसाई परिसरातील नातेवाईक, मित्रपरिवार पाहुणे व शिरूर तालुक्यातील सर्व दानशूर मान्यवरांनी उदंड असा प्रतिसाद दिला १लाख ७० हजार रुपये रोख रक्कम जमा झाली. एकूण रक्कम दोन लाख ४० हजार रुपये दशक्रियेच्या दिवशी राहुल पुंडे यांची बहिण सौ लता बाळासाहेब डफळ व बाळासाहेब श्रीपती डफळ यांचे कडे मुलांच्या संगोपनासाठी कान्हूर मेसाई गावातील आजी माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य सर्व नागरीक पाहुणे यांनी सुपूर्द मदत केली, सदर वेळी रक्कम स्विकारताना डफळ यांनी उपस्थितांचे व दांशुरांचे मनःपूर्वक हार्दिक आभार मानले व मुलांचे उत्तम प्रकारे संगोपन करील असे आश्वासन दिले. व्हाइस चेअरमन भीमाशंकर सहकारी साखर कारखाना प्रदीपदादा वळसे पाटील आणि एडवोकेट



देवराम धुमाळ यांनी दोन्ही मुलांची १२ वि पर्यंत शिक्षणाची जबाबदारी घेतली आहे.

संकटमोचक शहाजी बाळासाहेब दळवीराजे यांनी "एक हाथ मदतीचा" हे २७ वे आवाहन केले होते. त्यांनी मागील ६ वर्षा पासून "एक हाथ मदतीचा" या उपक्रमातून ७७ लाख रुपये गरजू व दुर्बल घटकांना कान्हूर व परिसरातील दात्यांच्या माध्यमातून मिळून दिले आहेत "निस्वार्थी सेवा करणारा जनसेवक" म्हणजे शहाजी आण्णा आपला स्वार्थ अभिमान आहे.यावेळी आदर्श माजी सैनिक महाराष्ट्र पोलीस भरत आबाजी पुंडे यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे, दानशुरांचे व शहाजी बाळासाहेब दळवी यांचे आभार मानले.

# 'लाडकी बहीण' योजनेच्या जाचक अटी रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करणाऱ्या महिलांना १ जुलैपासून लाभ देण्यात येईल असा महत्वपूर्ण निर्णय घेतानाच योजना सुलभ आणि सुटसुटीतपणे राबविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी विभागाला दिले.

योजनेसाठी नाव नोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले. अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देतानाच योजनेसाठी एकर शेतीची अट वगळण्याचा, लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६० वर्ष वयोगट ऐवजी २१ ते ६५ वर्ष वयोगट करण्याचा, परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील आधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचा जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल, असा निर्णय यावेळी घेण्यात आला.अडीच लाख रुपये उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल तर



ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या योजनेत कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेला सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येणार असून योजनेमध्ये सुधारणा केलेल्या निर्णयांचा शासन निर्णय तातडीने जाहिर करण्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. विधानभवन समिती कक्षात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते. या बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती उपमुख्यमंत्री पवार यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली आहे.



# नीट परीक्षा घोटाळेबाजांवर कारवाई करावी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नीट परीक्षा व पेपर फुटी संदर्भातील घोटाळेबाजांना कठोर शिक्षा करावी अशा प्रकारची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन केली. देश पातळीवर वैद्यकीय परीक्षेत प्रवेश घेण्यासाठी होणाऱ्या नीट परीक्षेमध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा झालेला आहे देशभरातील करोडो विद्यार्थी मेहनतीने संबंधित परीक्षेची तयारी करत असतात. अशावेळी काही कोटी रुपयांसाठी पेपर फोडून घोटाळे केले जात असतील, तर हे योग्य नाही. यामुळे करोडो विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होत आहे. डॉक्टर बनण्याचं स्वप्न उराशी बाळगून जिवापाड मेहनत करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सरकार खेळत आहे असा आरोप या ठिकाणी करण्यात आला. देशाच्या वेगवेगळ्या भागात या परीक्षेतील गैरप्रकार समोर आलेला आहे . त्यामुळे ही परीक्षा सरकारने आपल्या अधिपत्याखाली घ्यायला हवी. जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून ती प्रत्येक जिल्ह्यात राबवायला हवी. प्रशासनाचा यात हस्तक्षेप वाढला तर गैरप्रकार आटोक्यात देऊ शकतात.केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी घोटाळा व गडबड झाल्याचे मान्य केलेले आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये विविध भरती करताना पेपर फुटीचेही प्रकरण समोर आलेले आहे. जवळपास महाराष्ट्रामध्ये 72 भरती प्रक्रियेमध्ये पेपर फुटीचे प्रकरण झालेले आहेत. हे धोकादायक आहे. वशिलाबाजी लावून आडमार्गाने भरती कशी करता येईल याचा हा प्रयत्न चालू आहे. गुणवंत, हुशार, अभ्यासू विद्यार्थ्यांवर हा अन्याय होत आहे. भरती प्रक्रिया राबवणाऱ्या संस्था, एजन्सी, काही राजकीय नेते, नोकरशाह यांची यामध्ये मिलीभगत दिसून येत आहे. परीक्षा भरती मध्ये सुद्धा माफिया राज दिसून येत आहे असा आरोप देखील करण्यात आला आहे. अशा घोटाळाबाज लोकांवर त्वरित कारवाई व्हावी अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले, जोसेफ मलबारी, राजू डोमाडे, नंदू येलमामे, रामेश्वर साबरे, राजेंद्र सोलंकी, दीपक देवरे, सोनू घारू, डॉमिनिक मलबारी, भिका नेरकर, गोरख शर्मा ,निखिल मोमया, डी. टी. पाटील, वाल्मीक मराठे,भटू पाटील, मनोहर निकम, उषा पाटील, जयश्री घेटे, मंगलदास वाघ, अविष्कार मोरे, अमरजीत पवार, भूषण पाटील, विकी डिवरे, राजेंद्र सोनवणे, युसुफ शेख, स्वामिनी पारखे, राजेंद्र चौधरी, सज्जन बागुल, सुरेश जवराळ, शेख उझार, अझर पठाण, भूषण पाटील, पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समृद्धी महामार्गावरील दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना शासनाने तातडीने मदत करावी

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** समृद्धी महामार्गावरील दि. १ जुलै, २०२३ रोजी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना शासनाने केलेल्या घोषणेतील प्रत्येकी २५ लाख रूपये मदतीपैकी केवळ ७ लाख रूपये मिळाले असून उर्वरित मदत तातडीने देण्यात यावी अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज सभागृहात स्थगन प्रस्ताव मांडला त्यावेळी त्यांनी मागणी केली. वडेट्टीवार म्हणाले, दि. १ जुलै, २०२३ रोजी समृद्धी महामार्गावर बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा जवळ रात्री दीड वाजेच्या सुमारास लक्झरी बस जळून २५ प्रवाशांचा मृत्यू होण्याच्या दुर्घटनेला दि. १ जुलै, २०२४



रोजी एक वर्ष पूर्ण झाले आहे. मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २५ लाख रुपये देण्याची शासनाने केलेली घोषणा फोल ठरली असून मृतांच्या कुटुंबीयांची सीएम फंडातून केवळ ५ लाख रूपये आणि केंद्र सरकार कडून २ लाख रूपये मदत देऊन बोळवण करण्यात आली आहे. पुण्यातील पोर्शे कार घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दहा लाखांची मदत सरकारकडून तात्काळ करण्यात आली असताना ३६५ दिवस होऊनही समृद्धी महार्गावरील लक्झरी बस अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना मदत देण्यात टाळाटाळ होत आहे. अनेकवेळा मागणी करूनही मदत न दिल्याने सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर मडावी यांनी २६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गळफास घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. मुख्यमंत्र्याचा शब्द अंतिम असतो तो पाळण्यात यावा. तत्पर सरकार म्हणून मिरवणारे एक वर्ष उलटूनही मदत देत नसतील तर घोषणेला काय अर्थ असा सवाल करत मृतांच्या कुटुंबियांना तातडीने उर्वरित मदत देण्यात यावी अशी आग्रही मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.



# पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना नोटबुक

## अवंती - अंबर सामाजिक प्रतिष्ठानचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आपल्या विविध सामाजिक उपक्रमातून लोकहिताचे कार्य करण्यास सदा अग्रेसर असलेल्या चंद्रपुरातील अवंती - अंबर प्रतिष्ठानने शाळेच्या पहिल्याच दिवशी चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. आज 1 जुलैला शाळेचा पहिला दिवस होता. पहिल्याच दिवशी चंद्रपूर तालुक्यातील खुटाळा येथील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उच्च जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खुटाळा येथे विद्यार्थ्यांना शालेय नोटबुक वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी नोटबुक मिळयाल्याने विद्यार्थी आनंदित झाले होते.

आज अवंती अंबर सामाजिक प्रतिष्ठान चंद्रपूर"तर्फे शालेय विद्यार्थ्यांना नोटबुक वितरण करण्यात आले याप्रसंगी अवंती अंबर सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश भाऊ मेंढे , शाळेच्या मुख्याध्यापिका प्रभारत्न अंडरस्कर मॅडम गेडाम सर, बम्बोडे मैडम, वंजारी मॅडम खणके सर, मॅडम, बिडेकर मैडम, गणवीर मैडम, सागोडे मैडम, कोसरा ग्रामपंचायतचे उपरपंच रोशन रामटेके, अविनाश मेश्राम, दीक्षांत कांबले, सर्वेश पिसे तसेच संपूर्ण शालेय विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# डॉक्टरांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ. वैशाली परदेशी व त्यांच्या ग्रुप तर्फे पैठणमधील सर्व सन्माननय डॉक्टरांचा सन्मानचिन्ह देवुन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण डॉ.राम लोंढे तर अध्यक्ष स्थानी डॉ. शैलेश घोडके हे होते. यावेळी डॉ. राम लोंढे, डॉ. शैलेश घोडके व डॉ. पंडीत किल्लारीकर यांनी मनोगत व्यक्त करतांना इनरव्हिल क्लबचे सुरू असलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, डॉ. राम लोंढे, डॉ. शैलेश घोडके, डॉ.धनंजय अर्जुन, डॉ.पंडीत किल्लारीकर, डॉ. दिगंबर खणसे, डॉ. सुनंदा खणसे, डॉ. अनिल सासणे, डॉ. मनिषा सासणे, डॉ. उषा शिंदे, डॉ. दिपेश चेमटे, डॉ. शितल चेमटे, डॉ. प्रमु होरकटे, डॉ. पुजा होरकटे, डॉ. लक्ष्मीनारायण लोहिया, डॉ. वैशाली लोहिया, डॉ. श्रीपाद दवखणे, डॉ. दवखणे मॅडम, डॉ. कांतीलाल पहाडे, डॉ. गौतम पहाडे, डॉ. संदिप सोरमारे, डॉ. प्रितम भस्मे, डॉ. बंटी जैस्वाल, डॉ. मेघा दळवी, डॉ. सखु झारगड, डॉ. किर्ती लोंढे, डॉ. निता शिरवत, डॉ. अश्विनी गलांडे, डॉ.प्रिती गायकवाड, सर्व डॉक्टर उपस्थित होते.

# जि.प. शाळा आवारात प्रदूषण मंडळाच्या व्हॅनने केली हवेतील प्रदूषणाची तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गेल्या कित्येक वर्षांपासून पैठण एमआयडीसीमधील केमिकल कंपनीच्या दुषीत पाण्यामुळे विहिरीतील केमिकल युक्त पाण्यामुळे शेती नापीक होत असल्याने शेतकरी त्रस्त आहेत. याच कंपनीच्या वायु प्रदूषणामुळे जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना गेल्या कित्येक वर्षांपासून श्वसनाचा त्रास होत असल्याचे पालक सांगतात.

यापकरणी मुधलवाडीतील ग्रामस्थानी या कंपन्या विरोधात हरीत लवादाकडे विष्णु बोडखे सह गावकर्यांनी दादा मागीतली असता या पुर्वी कंपनीच्या केमिकल युक्त विहरीतील पाण्याचे नमुने तपासणी करण्यात आले,याच पार्श्वभूमीवर मंगळवार दि. 2 रोजी जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांना यापासून त्रास होतो कि काय म्हणून प्रदूषण मंडळाने



हवेतील कंपन्यातील निघणाऱ्या वायुमुळे तपासणीसाठी दोन दिवस ऐअर पोलुशन व्हँन पाठवली. यापूर्वीही प्रदूषण मंडळाच्या अशाच व्हँन ने हवेतील प्रदूषण तपासणी केली परंतु या केमिकल कंपनीवर कुठलाही कारवाई झाल्या नसल्याचा अरोप मुधलवाडीतील जि.प.शाळेच्या शालेय कमेटीचे उपाध्यक्षज्ञानेश्वर आगळे यांनी केला आहे. याप्रकरणी मुधलवाडीतील जि.प.शाळेच्या शालेय कमेटीचे अध्यक्ष योगेश जाधव यांनी यानी सांगितले कि या केमिकलच्या तिव्र वासामुळे शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना त्रास होत आहे,काही मुलांना श्वसनाचे त्रास देखील होतात परंतु पालक हि या बाबत जागृत नसल्याने या केमिकल कंपन्यावर कारवाई आज पर्यंत झाली नाही.परंतु आता आम्ही शालेय कमेटीच्या वतीने ठराव घेवुन केमिकल कंपन्यावर कारवाई करा अन्यथा अंदोलन उभारण्यात येईल अशी प्रतिक्रिया शालेय कमेटीचे अध्यक्ष योगेश जाधव यांनी दिली. यावेळी विष्णु बोडखे, शैलेश मिसाळ, बप्पासाहेब आढाव सह पालक उपस्थित होते.

# वीज समस्यांबाबत शेकाप आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** एमएसईबी केंद्रावर ९ जुलैला शेकाप उरणने मोर्चा जाहीर केला असून मोठ्या तयारीने न्याय मिळविणारा मोर्चा काढणार ! असा आक्रमक पवित्रा शेकाप उरणचे चिटणीस विकास नाईक आणि शेकापच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी घेतला असून एमएसईबीने चर्चेसाठी बोलावले असता आपले मत आक्रमक पणे मांडून ९ जुलैला मोर्चा काढणारच असे आक्रमक मत व्यक्त केले. वाढीव बिले देताना,किंवा ग्राहकांवर कारवाई करताना, गावात रात्रीबेरात्री येऊन गावातील कुणाही साक्षीदारास न घेता ग्राहकांना गुन्हेगार ठरवून बेहिशोबी दंड करणे हे चुकीचे असून उरणची जनता शोषित बनून आर्थिक त्रास सहन करत आहे.कधीही लाईट जाणे,ती अनिश्चित वेळी येणे, दररोजचा त्रास झाला आहे.कमर्सियल आणि घरगुती वीज वापर आणि कमर्शियल वापरात असलेला मोठा भ्रष्टाचार, अधिका-यांच्या इच्छेनुसार मिटर बदल, गावागावांमध्ये सरकारी कायम कामगार आणि टेंपररी कामगार कोण हे समजणे अवघड झाले आहे. गावात कमर्शियल मीटर देताना पैशांच्या मोठ्या मागणी केली जात आहे .इत्यादी विषयांवर मोठी चर्चा झाली परंतु योग्य आणि निर्णायक उत्तर मिटिंग मध्ये मिळाले नाही.तरी ०९ जुलैला उत्तर घेऊच असे शेकाप कार्यकर्त्यांनी ठरविल्याचे समजले.

# अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणासाठी प्रा. रामचंद्र भरांडे यांचे आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**संजय कांबळे**

**नांदेड :** अनुसूचित जाती प्रवर्गातील ५९ जाती करीता १३ टक्के आरक्षणाची तरतुद आहे. मात्र मागील साठ वर्षातील आरक्षणाच्या लाभार्थ्यांची जातनिहाय आकडेवारीवर नजर टाकल्यास असे स्पष्ट दिसते की, या प्रवर्गातील सर्व जाती समुहांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षण व नोकरीत प्रतिनिधीत्व मिळाले नाही. एका बाजुला मराठा, धनगर आणि ओबीसी आरक्षणावरुन महाराष्ट्रात रणकंदन माजलेले आहे. ग्रामपंचायत असो किंवा साधनसंपत्ती, उत्पन्नाची साधने असो यावर आजही अनुसूचित जातीच्या तुलनेत हे सक्षम आहेत. तरीही सरकार व त्यांचे प्रतिनिधी त्यांच्या आंदोलनास तळहातावरील फोडाप्रमाणे जपत आहेत. दुसऱ्या बाजुला मातंग व तत्सम आरक्षण लाभवंचित जाती या अनुसूचित जाती आरक्षणाचे वर्गीकरण करुन त्यांना सामाजिक न्याय द्यावा, ही मागणी अनेक वर्षांपासून करत असताना यावर शासन मात्र तोंडावर, कानावर आणि डोळ्यावर हात ठेवून बसले आहे. जवळसपास 50 ते 60 विधानसभा मतदार संघात निणार्यक भूमिका हाताळणारा मातंग समाज आजही आर्थिक, शैक्षणिक बाबतीत मागासलेला आहे. मातंग समाजाच्या या मागण्यांसाठी लोकस्वराज्य आंदोलनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे हे 1 जुलैपासून जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे उपोषणाला बसले आहेत.

प्रा. रामचंद्र भरांडे म्हणाले की, महाराष्ट्रातील शासकिय वसतिगृहामध्ये मागील दहा वर्षात राबविण्यात आलेल्या वसतिगृह प्रवेश प्रक्रियेची सखोल चौकशी करुन दोषीवर विरुध्द नियमानुसार गुळे दाखल करण्यात यावेत. शासन निर्णयामध्ये अनु. जातीच्या जागांच्या टक्केवारी पैकी मांग-भंगी या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात




आलेल्या (आरक्षीत) जागेनुसार वसतिगृहात प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे मांग, भंगी, वाल्मीकी, मेहतर या जातीतील विद्याथ्यर्थ्यांना अनु. जाती मधुन ठरवून दिलेल्या आरक्षणाची अमलबजावणी केल्या जात नाही. त्यामुळे अनु. जातीतील कांही पुढारलेल्या जाती वगळता उर्वरीत इतर अनु. जातीचे विद्यार्थी वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहतात. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा दि. १६ मे १९८४ रोजीच्या शासन निर्णयास मागील दहा वर्षात केराची टोपली दाखवणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांची सखाल चौकशी करून दोषी विरुध्द गुन्हे दाखल करण्यात यावे. याच प्रमाणे शासकिय निवासी शाळांमध्येही प्रवेश प्रक्रिया राबविताना दि. १६ मे १९८४ रोजीच्या शासन निर्णयानुसार राखीव जागाबाबत मार्गदर्शक शासन निर्णय निर्गमित अनुसूचित जाती आरक्षणच्या वर्गीकरणाचा प्रश्न मराठा, धनगर आरक्षणाच्या तुलनेने सोडविणे सोपे आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाने पंजाब आरक्षण वर्गीकरणाचा खटल्यात अनुकूल भुमिका घेतलेली आहे. तरीही सरकार यावर केवळ कागदी घोडे नाचत आहे. हयावर समाजाचा मोठ्या प्रमाणावर रोष आहे. हयाची चुणुक नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत समाजाने सत्ताधाऱ्यांच्या विरोधात मतदान करुन आपला रोष व्यक्त केला आहे. तरीही सरकारने हया येऊ घातलेल्या विधानसभा मध्ये पुर्वी हा पश्न सोडवावा आणि मातंग समाजाच्या अनुषंगाने तत्सम प्रश्न सोडवावेत यासाठी लोकस्वराज्य आंदोलनाच्या वतीने १ जुलै २०२४ पासून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

अनु. जाती प्रवर्गामधुन अबकड वर्गीकरण तात्काळ करा गायरान जमिन कास्तकारांच्या नावे विना अट व दलित मागासर्गीय वस्तीमधील अनाधिकृत अवैध देशी विदेशी दारु विक्री त्वरित बंद करा, दलित, मागासवर्गीय अन्याय अत्याचार प्रकरणाची तात्काळ चौकशी करण्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत कार्यरत असलेले शासकिय वसतीगृहामध्ये अनुसुचित जातीच्या कोणत्याही एका जातीच्या विद्यार्थ्यांना ३०% पेक्षा जास्त मागा देवू नयेत असा स्पष्ट उल्लेख दि. १६ मे १९८४ च्या शासन निर्णयामध्ये असून सुध्दा प्रत्यक्षात मात्र वसतिगृह प्रक्रिया राबवताना सदर शासन निर्णयाचे पालन केले जात नाही. त्यामुळे अनु. जाती या प्रवर्गातील कांहीं मोजक्या जाती वगळता इतर जातींच्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशापासून वंचित ठेवल्या जाते. स्वाधार योजना ही ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत असल्यामुळे सदर योजने मध्ये अधिकारी-कर्मचारी यांचा मनमानी कारभार सुरु असून प्रचंड भ्रष्टाचार सुरु आहे. त्यामुळे स्वाधार ही योजना भारत सरकार शिष्यवृत्ती योजने प्रमाणेच ऑनलाईन प्रणाली मार्फत राबविण्यात यावी. तसेच स्वाधार योजनेच्या लाभार्थीस दरवर्षी लाभ घेतल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात यावे आणि संबंधित विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत कमीत कमी कागदपत्रांची मागणी करुन स्वाधार योजना मंजूर करण्यात यावी. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजने मध्येही प्रचंड भ्रष्टाचार होत असुन मागील २० वर्षात अनु. जाती मधील कांही मोजक्याच जातीतील लाभाथ्यर्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिल्याचे दिसून येते. त्यामुळे अनु. जातीतील लाभापासून वंचित ठेवलेल्या इतर जातीतील लाभार्थ्यांनाही सबळीकरण योजनेचा लाभ मिळवून देण्याकरीता विशेष व्यवस्था सामाजिक विकास योजनेमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करुन दोषी अधिकारी कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे. वसतिगृह भोजन ठेक्यामध्ये भोजन पुरविण्याच्या दरामध्ये जवळपास दुप्पट वाढ करुन एका बीव्हीजी या खाजगी कंपनीला फायदा पोहचविण्याचे शासनाचे धोरण अत्यंत कुचकामी असून भोजन दरामध्ये दुप्पट वाढ करुनही भोजनाचा दर्जा मात्र दिवसेदिवस अत्यंत निकृष्ट होत आहे. तसेच महाराष्ट्रातील कुठल्याच शासकीय वसतिगृह व निवासी शाळेत भोजनामध्ये शासन निर्णयानुसार भोजन पुरवठा केला जात नाही. या बाबतही चौकशी पथक नेमुन दोषीवर कार्यवाही करा. यावेळी प्रदेशाध्यक्ष व्ही.जी. डोईवाड, ज्येष्ठ नेते रावसाहेब दादा पवार, जिल्हाध्यक्ष धोडोपंत बनसोडे, अंकुश गायकवाड, कॉ. गणपत रेड्डी, सुनील जाधव, संगीता पवळे, मारोतराव घोरपडे, डी.एन. मोरे आदींसह समाज बांधवांची यावेळी उपस्थिती होती.

## फुलंब्री विधानसभा मतदारसंघातील महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** लाडकी बहीण या योजनेसाठी पात्र असलेल्या एकही महिला योजनेपासून वंचित राहता कामा नये यासाठी फुलंब्री विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक महिलांनी या योजनेचा अर्ज भरून घ्यावा, असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे फुलंब्री शहराध्यक्ष अजहर



पटेल यांनी केले आहे.

एक जुलै पासून सुरू होणारी ही योजना महिलांसाठी उपयुक्त ठरणार आहे या योजनेच्या माध्यमातून आपण प्रत्येक पात्र महिलेला दर महिन्याला दीड हजार रुपये मिळणार आहे यामध्ये शुक्रवारी रोजी महाराष्ट्र विधानसभेत अर्थसंकल्पात राज्यातील महिलांच्या आर्थिक व स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली आहे.या योजनेत पात्र महिलेला स्वतःच्या आधार लिंक केलेल्या बँक खात्यात थेट पैसे जमा होणार आहेत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मार्फत योजना राबवली जाणार आहे शासन निर्णय मध्ये पात्र अपात्रेची निकष दिले आहे त्याची शहनिशा करून पात्र लाभार्थ्यांनी अर्जासोबत लागणारी सर्व कागदपत्रे उपलब्ध करून दिल्यानंतर कार्यालयातून सर्व अर्ज ऑनलाईन करण्यात येणार आहे. लाभार्थ्यांनी लवकरात लवकर कागदपत्रे उपलब्ध करून दिल्यास येत्या 15 ऑगस्ट रोजी पहिला हप्ता मिळेल असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे फुलंबी शहराध्यक्ष अजहर पटेल यांनी दैनिक आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी सरफराज पटेल यांच्याशी बोलताना सांगितले.

## शिंदखेडाचा चंद्रकांत ठरला एम.पी.एस.सी चॅम्पियन धुळे जिल्हा युवासेनेने केला सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नुकत्याच जाहीर झालेल्या 2023 च्या महाराष्ट्र



लोकसेवा आयोगाच्या संयुक्त परीक्षेत चंद्रकांत ज्ञानेश्वर पाटील याची सहाय्यक कक्ष अधिकारी,मंत्रालय व राज्य कर निरीक्षक (जी. एस. टी इन्स्पेक्टर) या दोन्ही पदांवर निवड झाली आहे. दसवेल गावचे साहेबराव तानकु पाटील यांचा नातू चंद्रकांत याचे १२ वी पर्यंत शिक्षण मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना येथे झाले. वडील ज्ञानेश्वर पाटील हे जालना जिल्ह्यात ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहेत. मुळगाव दसवेल- होळ (ता. शिंदखेडा) येथे लॉकडाऊन च्या काळात एम.पी.एस.सी करणाऱ्या गावातल्या मित्रांकडून परिक्षेबद्दल समजले. एका नामांकित आय.टी कंपनीत नोकरी करतानाच अभ्यासाला सुरूवात केली होती. त्यांनतर 2 वर्षे एम.पी.एस.सी मुख्य परीक्षेत अपयश आले. चांगली नोकरी सोडली म्हणून साहजिक घरातील,समाजातील लोकांचा दबाव जाणवत होता; पण त्याही काळात नोकरी करतोय असे सगळ्यांशी खोटं बोलून पुण्यात एम.पी.एस.सी च्या विद्यार्थ्यांना शिकवून स्वतःची आर्थिक गरज पुर्ण करून शिकत राहिला. सरळसेवा परीक्षेअंतर्गत पुणे मनपा क्लर्क, रायगड सिनियर क्लर्क व तलाठी येथे निवड झाली. पुण्यातल्या सदाशिव पेठेत चंद्रकांत पाटील याचे रेडिओ एम.पी.एस.सी हे ॲप अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे, त्याद्वारे इतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम आता चंद्रकांत करत आहे. सध्या सहायक सहकार अधिकारी पदावर सहकार आयुक्तालय, पुणे येथे तो कार्यरत आहे. कोणतेही क्लास न लावता, स्वतःच एम.पी.एस.सी विद्यार्थ्यांना शिकवत त्याने हे यश मिळवले. आईवडिलांनी करिअर बद्दल ठराविक अपेक्षा न ठेवता मला माझे रस्ते निवडण्याचे स्वातंत्र्य दिले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दसवेल, शिरपूर,जालना,पुणे अश्या विविध ठिकाणी राहून अभ्यास केला त्यामुळे परीक्षेच्या तयारीसाठी तुम्ही कुठे अभ्यास करता? कोणते क्लास लावता? त्यापेक्षा तुमची महत्त्वाकांक्षा, चिकाटी, प्रामाणिक प्रयत्न असावेत असे तो सांगतो. 2023 च्या पूर्व परीक्षेआधीच यंदा मेरीट लिस्ट मध्ये माझं नावं असणार असे व्हॉट्सअप स्टेटस तो ठेवायचा त्यातून त्याला अभ्यासाची प्रेरणा मिळायची असे सुमित घोडसे यांनी सांगितले, महेनीतीच्या व चिकाटीच्या जोरावर चंद्रकांत सारखेच यश आपल्या ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळू शकते असा विश्वास युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी युवासेना जिल्हाप्रमुख हरीश माळी,उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे,युवती विस्तारक सोनी सोनार,महानगरप्रमुख सिद्धार्थ करनकाळ,महानगरप्रमुख मनोज जाधव,जिल्हा समन्वयक मोहित वाघ, सुमित घोडसे उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# माझी लाडकी बहीण योजनेचा हिंगोलीतील पात्र महिलांनी लाभ घ्यावा

## शिवसेना महिला आघाडीच्या नेत्या कांचनताई लेकुळे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महायुती सरकारने सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील महिला भगिनींच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य व घोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णय भूमिका मजबूत करण्यासाठी माझी लाडकी बहीण ही योजना सुरू करण्याचा निर्णय घेतलेला आहे या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सदर योजनेचा सर्व पात्र महिला भगिनींनी लाभ घेण्याचे



आवाहन शिवसेना महिला आघाडी हिंगोलीच्या नेत्या कांचनताई रवी लेकुळे यांनी केले आहे.



या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असलेल्या, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लक्ष रुपये पेक्षा कमी असणाऱ्या २१ ते ६० या वयोगटातील महिला भगिनींना दरमहा १५०० रुपये मानधन देण्यात येणार आहे या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातील लाभार्थी महिलांनी आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, बँक पासबुक प्रत, पासपोर्ट आकाराचा फोटो, रेशन कार्ड, जन्माचा दाखला हमीपत्र इत्यादी कागदपत्रासह ऑनलाइन अर्ज करावा. ज्या महिलांना ऑनलाईन अर्ज करणे शक्य नाही त्यांना गावातील अंगणवाडी सेविका/ पर्यवेक्षिका/ सेतू सुविधा केंद्र/ग्रामपंचायत / ग्रामसेवक यांचा माध्यमातून अर्ज करता येईल. तसेच शहरी भागामध्ये महिला भगिनींनी अंगणवाडी सेविका/नगरपरिषद/ सेतू सुविधा केंद्र या माध्यमातून ऑनलाईन अर्ज करावे. शिवसेना महिला आघाडी हिंगोलीच्या नेत्या कांचन लेकुळे यांनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त महिला भगिनी या योजनेचे लाभार्थी होतील यासाठी पुढाकार घेतला आहे. सदर योजनेसाठी 1 जुलै ते 31 ऑगस्ट 2024 या कालावधीत आवश्यक कागदपत्रासह विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे गरजेचे आहे.

# शिक्षण हे विद्यार्थ्याला आत्मनिर्भर बनविते : प्रा. गजेंद्र आसूटकर

## सर्व समाजातील गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** विद्यार्थी हा उज्ज्वल भारताचा नागरिक आहे. त्याने अभ्यासात प्राविण्य प्राप्त करून आपले नाव कमवावे. अहल्यादेवी यांनी आपल्या काळात शिक्षणाला फार महत्व दिले होते. आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांनी अहल्यादेवी यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेऊन जीवन जगावे. आपल्याला काय वाटते ते आत्मसात करावे. आपल्या शिक्षणामुळे देशाला, समाजाला काय फायदा होणार याचासुद्धा विचार विद्यार्थ्याने आपल्या जीवनात करावा. शिक्षणामुळे विद्यार्थ्याला आत्मनिर्भर बनण्यास मदत होते, असे प्रतिपादन प्रा. गजेद्र आसूटकर यांनी केले. पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती समारोह नागरी समिती तर्फे सर्व समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम स्थानिक जनता महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला. या कार्यक्रमात उद्घाटक म्हणून सरदार पटेल विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या अंजली हस्तक या होत्या. तर प्रमुख वक्ते म्हणून नागपूर येथिल प्रियदर्शिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उपप्राचार्य गजेंद्र आसूटकर होते. त्यासोबतच मंचावर समितीचे अध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे, समितीचे मार्गदर्शक तुषार देवपुजारी, ग्राम पंचायत सदस्या दाताळा प्रतिभा काळे, पुष्पा गुलवाडे हे मंचावर उपस्थित होते. यंदाचे वर्ष हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे आहे. या पर्वाचे औचित्य साधून त्यांच्या महत्कार्याची जाणीव जागृती व्हावी यासाठी चंद्रपूर येथील त्रिशताब्दीय जयंती समारोह नागरी समितीच्या वतीने यंदा वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचा शुभारंभ येत्या 31 मे रोजी झाला असून, सर्व समाजातील विद्यार्थ्यांना अहिल्यादेवीच्या कार्याची जाणीव व्हावी या हेतूने सर्व समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित कार्यक्रामाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अंजली हस्तक यांनी, पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तुषार देवपुजारी यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या तसेच पुष्पा गुलवाडे यांनी विद्यार्थी जीवनात समाज कार्याची जोड कशी निर्माण करावी यांचे उदाहरण विद्यार्थ्यासमोर ठेवले. डॉ. मंगेश गुलवाडे यांनी समिती तर्फे विद्यार्थ्यासाठी घेण्यात येणाऱ्या वार्षिक कार्यक्रमाची माहिती दिली व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी अहल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रातून काही प्रेरणा घेण्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात १० वी , १२ वी च्या सर्व समाजातील एकूण १०० विद्यार्थ्यांचा सत्कार समिती तर्फे प्रमाणपत्र, शिल्ड, पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्राचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात सुरुवातीला रत्ना साव यांनी अहल्यागीत गायिले. कार्यक्रमाचे संचालन खेमदेव कन्नमवार व सुनंदा कन्नमवार यांनी केले. वंदेमातरम् अदिती देव यांनी म्हटले, तर आभार प्रदर्शन महेश आस्कर यांनी केले.

# 'लाडक्या बहिणी'ला लाच मागणे भोवले

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** राज्य सरकारने मध्यप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू केली. योजनेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १५ जुलैपर्यंतच असल्याने, महिलांनी पहिल्या दिवसापासूनच गर्दी केली आहे, पण या योजनेच्या नावाखाली अर्जदारांची लूट सुरू असल्याच्या घटना समोर आली आहे. जिल्ह्यातील वरूड येथे एक तलाठी अर्जदार महिलांकडून पैसे घेत असल्याची चित्रफित समाज माध्यमावर प्रसारीत झाली आहे. याप्रकरणी तलाठ्याला निलंबित करण्यात आले आहे. तुळशीराम कंठाळे असे निलंबित करण्यात आलेल्या लाचखोर तलाठ्याचे नाव आहे. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मंगळवारी यासंदर्भात माहिती दिली. महाराष्ट्र शासनाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना १ जुलैपासून सुरू केली. या योजनेसाठी २१ ते ६० वर्षे वयोगटातील महिला पात्र असून यासाठी १ जुलैपासून तलाठी कार्यालय तसेच शहरी भागात तहसील कार्यालयात आणि कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वरुड येथे या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी तुळशीराम कंठाळे हा तलाठी चक्क महिलांकडून पैसे वसूल करत असल्याचे समोर आले. महिलांकडून पैसे उकळतानाची त्याची चित्रफित आणि छायाचित्र प्रसारीत झाल्याने खळबळ उडाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महत्वकांक्षी योजना आहे. या योजनेअंतर्गत महिलांना लाभ मिळावा असा उद्देश असताना महिलांकडूनच या योजनेसाठी लाच स्वीकारणाऱ्या तलाठ्याच्या प्रतापाची दखल स्वतः मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे. यामुळच त्या तलाठ्याला तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे.



# संविधान साक्षरता हेच बार्टीचे ध्येय आहे : डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान दिंडीचे आयोजन करण्यात आले असुन संविधानाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आळंदी ते पंढरपूर पर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनात्मक कार्यक्रमाद्वारे संविधानाचे महत्व बहुजन समाज आणि वारकरी बांधवाना कळावे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने या देशाचे संविधान लिहून या देशातील जनतेला न्याय दिला.संविधान हाच या देशाचा राष्ट्रीय ग्रंथ असून बहुजनांच्या प्रत्येक समस्येचे निराकरण भारतीय संविधान करते यासाठी संविधान साक्षरता करणे हेच दिंडीमध्ये बार्टीचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे असे प्रतिपादन बार्टीचे विभागप्रमुख डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी केले. समता, न्याय, बंधुता, स्वतंत्र्याचा संविधानिक विचार जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेमार्फत संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संविधान दिंडीचे आयोजन बार्टीच्या वतीने करण्यात आले आहे. आळंदी येथे संविधान दिंडीचे उद्घघाटन डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. मनोगत व्यक्त करताना त्यांनी संविधानाबद्दल व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी वारकरी बांधव, विद्यार्थी व नागरिकांना भारतीय राज्यघटनेची प्रत व उद्देशिका भेट देऊन सन्मानित करण्यात आले.प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी संविधान जनजागृती कार्यक्रमाद्वारे संविधानाचे महत्व सांगितले.प्रकल्प व्यवस्थापक नितिन सहारे, सुमेध थोरात,महेश गवई,डॉ.अंकुश गायकवाड, सुनंदा गायकवाड,जागृती गायकवाड, तेजस्विनी सोनवणे, उषा भिंगारे, शितल बडगर, सचिन नांदेडकर, युनुस तडवी, आकाश कु-हाडे, राहुल कवडे,समतादुत यांच्यासह वारकरी बांधव, विद्यार्थी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.सुत्रसंचलन प्रकाशन विभागाचे रामदास लोखंडे यांनी केले.आभार प्रकल्प व्यवस्थापक नितिन सहारे यांनी मानले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर